रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १६ ◆ अंक १२३
www.ramprahar.com
सोमवार, २० नोव्हेंबर २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

सहकार चळवळ सशक्त झाली पाहिजे -आमदार प्रवीण दरेकर/२
माथेरानमध्ये व्यावसायिकांची दिवाळी जोरात/५
कोलाड येथे जापनिज कराटे स्पर्धा उत्साहात/८

## भारताचे विश्वचषकाचे स्वप्न भंगले; ऑस्ट्रेलिया विजेते



**अहमदाबाद** : ऑस्ट्रेलियाने भारताला पराभूत करीत विश्वचषक जिंकला. अंतिम लढतीत भारतीय संघ २४० धावांवर गारद झाला होता. त्यानंतर ट्रेव्हिस हेडच्या शतकाच्या जोरावर ऑस्ट्रेलियाने हा सामना सहा विकेट्स राखून सहजपणे जिंकला आणि सहाव्यांदा विश्वचषक उंचावला. या स्पर्धेत भारताने सलग १० सामने जिंकले होते, मात्र ११व्या आणि अंतिम सामन्यात संघ हरला. ऑस्ट्रेलियाचा कर्णधार पॅट कमिन्सने नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. भारतीय संघ प्रथम फलंदाजी करताना ५० षटकांत २४० धावाच करू शकला. प्रत्युत्तरात ऑस्ट्रेलियाने ४३ षटकांत चार विकेट गमावत २४१ धावा करून सामना जिंकला. कांगारू संघासाठी ट्रॅव्हिसने १४१ धावांची मॅचविनिंग इनिंग खेळली, तर मार्नस लाबुशेनने नाबाद ५८ धावा केल्या. या पराभवामुळे २००३ची पुनरावृत्ती होऊन भारताचे तिसऱ्यांदा ट्रॉफी जिंकण्याचे स्वप्न भंगले.

# आरक्षणासाठी मराठ्यांची एकजूट आवश्यक

## मनोज जरांगे-पाटील यांचे महाडमधील सभेत आवाहन

**महाड : प्रतिनिधी**

मराठ्यांना आरक्षण १०० टक्के मिळणार, मात्र त्यासाठी एकजूट गरजेची असल्याचे प्रतिपादन मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे-पाटील यांनी रविवारी (दि.१९) महाड येथे केले. ते जाहीर सभेत बोलत होते.

मराठा आरक्षणासाठी राज्यव्यापी दौऱ्यावर निघालेले मनोज जरांगे-पाटील हे रविवारी सकाळी किल्ले रायगडी दाखल झाले. छत्रपती शिवाजी महाराजांचे दर्शन घेऊन त्यांनी महाड चवदार तळे येथे महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले. त्यानंतर त्यांनी जाहीर सभेत सकल मराठा समाजाला संबोधित केले. १ डिसेंबरपासून साखळी उपोषणला तयारीला लागा, असे त्यांनी सूचित केले.

दरम्यान, महाड येथील मराठा समाजाची सभा उद्धव ठाकरे गटाकडून छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे घेण्यात आली होती, मात्र ओढूनताणून तीन हजार लोक जमल्याने महाडमधून या सभेला हवा तसा प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे ठाकरे गटावर नामुष्की ओढावली.



(छाया : महेश शिंदे)

## आज खोपोली, नवी मुंबईत सभा

**खोपोली, नवी मुंबई** : आरक्षणाची मागणी करणारे मराठा समाज नेते मनोज जरांगे-पाटील यांची सोमवारी (दि.२०) खोपोलीत आणि नवी मुंबईत सभा होणार आहे. मराठा क्रांती मोर्चा आणि सकल मराठा समाजाच्या वतीने खोपोलीजवळील चिंचवली शेडवली-लौजी डीपी रस्त्यालगतच्या मैदानात दुपारी ३च्या सुमारास जरांगे-पाटील यांची सभा होणार असून त्यानंतर सायंकाळी ५ वाजता नवी मुंबईतील घणसोली येथील धर्मवीर संभाजीराजे मैदानात सभा होईल. या सभांची तयारी पूर्ण झाली आहे.



(छाया : अक्षय शार्दुल) अधिक छायाचित्रे पान ३ वर..

## आगरी कराडी कामोठ्याचा महोत्सवाचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कै.बळीराम राघो पावणेकर सार्वजनिक वाचनालय आणि ग्रंथालय तसेच झेंडा सामाजिक संस्थेच्या वतीने १२व्या आगरी कराडी कामोठ्याचा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाचे उद्घाटन भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते शनिवारी (दि.१८) झाले.

गेल्या ११ वर्षांपासून कामोठ्यासह परिसरातील नागरिकांसाठी सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल असलेला आगरी कराडी कामोठ्याचा महोत्सव पर्वणी ठरत आहे. यंदाचा १२वा महोत्सव सेक्टर १२ येथील सोनारी मैदानात भरवण्यात आला आहे. या महोत्सवात नागरिकांना विविध सांस्कृतिक कार्यक्रमांसह विविध




खाद्यपदार्थांची मेजवानी मिळणार आहे. शनिवारी या महोत्सवाचे उद्घाटन झाले.

या महोत्सवात रविवारी दिलखेच लावणी, सोमवारी सोलो डान्स व कामोठे आयडॉल, मंगळवारी हभप वनिता पाटील यांचे कीर्तन, बुधवारी ब्रास ब्रँड महोत्सव, गुरुवारी ग्रुप डान्स, शुक्रवारी कामोठे श्री शरीरसौष्ठव स्पर्धा, शनिवारी मिस कामोठे, रविवारी धमाल कोळीगीते व सोमवारी महाराष्ट्राची लोकधारा या कार्यक्रमांचे नियोजन केले गेले.

महोत्सवाच्या उद्घाटन समारंभास भाजपचे कामोठे शहर अध्यक्ष रवींद्र जोशी, माजी नगरसेविका कुसुम म्हात्रे, पुष्पा कुत्तरवडे, महिला मोर्चाच्या शहर अध्यक्ष वनिता पाटील, विद्या तामखडे, छाबा फाऊंडेशनचे दामोदर चव्हाण, मयुर मोहिते, शहर सरचिटणीस शरद जगताप, युवा मोर्चा अध्यक्ष तेजस जाधव, चिटणीस विक्की टेकवडे, किरण जाधव, शारदा तोंडरे, श्रावण घरत, प्रदीप हिरवे, स्वामी म्हात्रे, रामदास पावणेकर, संस्थापक अशोक पावणेकर, जय पावणेकर, जगदीश पावणेकर, विशाल पावणेकर, अरुण पावणेकर, सुमित गोवारी, विशाल बेलकर, अमोल कडू, अनिल हावले यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा महोत्सव २७ नोव्हेंबरपर्यंत रंगणार आहे.

## राजस्थानमध्ये काँग्रेसवाले एकमेकांना धावबाद करताहेत

### पंतप्रधान नरेंद्र मोदींचा हल्लाबोल

**चुरू : वृत्तसंस्था**

राजस्थान विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची रविवारी (दि.१९) चुरू येथे सभा झाली. या वेळी क्रिकेटचा संदर्भ घेत पंतप्रधानांनी काँग्रेसला लक्ष्य केले. काँग्रेसवाले एकमेकांना धावबाद करीत आहेत, असे त्यांनी म्हटले.

पंतप्रधान मोदी म्हणाले, या भूमीच्या प्रत्येक कणात भक्ती आणि शक्ती आहे, मात्र काँग्रेसचे लोक एकमेकांना धावबाद करीत आहेत. पक्षात उरलेल्यांचीही महिला आणि अन्य प्रश्नांवर चुकीची विधाने केल्याने विकेट पडत आहे. बाकीचे लाच घेऊन सामना फिक्सिंग करीत आहेत, तर भाजप राजस्थानचे चषक जिंकत आहे.

काँग्रेस संघाची परिस्थिती अशी असेल, तर ते धावा कशा काढणार? आणि तुमच्यासाठी काय काम करणार? लाल डायरीची पाने हळूहळू उघडत आहेत तसे मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांच्या फ्यूज उडत आहेत. मुख्यमंत्र्यांची जादू लाल डायरीत दिसत आहे. आपल्याला प्रत्येक बूथवर पाच ते सहा शतके करायची आहेत. काँग्रेसने प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार केला आहे. भाजपचे सरकार आल्यानंतर सर्व भ्रष्टाचारी लोकांची विकेट घ्यायची आहे, असे पंतप्रधान मोदींनी म्हटले.

## राष्ट्रवादी कुणाची? आजपासून सुनावणी

**मुंबई** : राष्ट्रवादी काँग्रेसवर ताबा कुणाचा या मुद्द्यावरून सुरू असलेल्या संघर्षावर केंद्रीय निवडणूक आयोगात सोमवार (दि.२०)पासून नियमित सुनावणी होणार आहे. दोन्ही गटांनी पक्ष व घड्याळ या निवडणूक चिन्हावर दावा सांगितला असल्याने आयोग कोणाच्या बाजूने कौल देणार याकडे सर्वांचे लक्ष असेल.

## निवडक

### ना. नितीन गडकरी यांच्याकडून मजुरांच्या बचावकार्याचा आढावा

**डेहराडून** : उत्तरकाशीच्या सिल्क्यरा गावात निर्माणाधीन बोगद्यात अडकलेल्या ४१ मजुरांच्या सुटकेचे प्रयत्न सुरूच आहेत. यासाठी आता पाच आघाड्यांवर बचाव मोहीम राबवण्यात येणार आहे. दरम्यान, केंद्रीय रस्ते वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांनी रविवारी (दि.१९) घटनास्थळी जाऊन बचावकार्याचा आढावा घेतला. या वेळी त्यांनी दोन ते अडीच दिवसांत कामगारांपर्यंत पोहचणार असल्याचे सांगितले.

### भारतीय हवाई दलात भरती प्रक्रिया सुरू

**नवी दिल्ली** : भारतीय हवाई दलाने कमीशंड ऑफिसर पदांसाठी नवीन भरती जाहीर केली आहे. या भरती अंतर्गत एकूण ३१७ रिक्त जागा भरल्या जाणार आहेत. भरतीसाठी पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. उमेदवार आपले अर्ज ऑनलाईन पद्धतीने करू शकतात. ऑनलाईन अर्ज करण्याची शेवटची तारीख ३० डिसेंबर आहे.

## स्व.लता मंगेशकर संगीत विद्यालयाचे भूमिपूजन

### पुढच्या पिढीसाठी गुरूकुल उपयुक्त ठरेल -मुख्यमंत्री

**ठाणे : प्रतिनिधी**

आजचा दिवस आपल्या सर्वांसाठी भाग्याचा दिवस आहे. आपल्या देशाची शान असलेल्या गानकोकिळा लता मंगेशकर यांच्या स्मृती चिरंतर ठेवणारे स्व.लता मंगेशकर संगीत विद्यालयाचे (गुरूकुल) भूमिपूजन ठाण्यात होत आहे. हे गुरूकुल भारतीय संगीताचा अनमोल वारसा पुढच्या पिढीला देण्यासाठी उपयुक्त ठरेल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रविवारी (दि.१९) येथे केले.

आमदार प्रताप सरनाईक यांच्या प्रयत्नाने राज्य शासनाच्या महापालिका क्षेत्रातील मुलभूत सोयीसुविधांचा विकास या योजनेंतर्गत ठाणे महापालिका क्षेत्रातील रेप्टोक्रॉस आरक्षित भूखंड वर्तकनगर येथे भारतरत्न स्व.लता दीनानाथ मंगेशकर संगीत विद्यालय (गुरूकुल) उभारण्याच्या कामाचा



भूमिपूजन सोहळा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते व ज्येष्ठ गायिका व संगीतकार उषा मंगेशकर, आमदार प्रताप सरनाईक यांच्या उपस्थितीत डॉ.काशिनाथ घाणेकर नाट्यगृह येथे झाला. त्या वेळी मुख्यमंत्री बोलत होते.

या सोहळ्यास मीना खडीकर, ज्येष्ठ गायक आदिनाथ मंगेशकर, ठाणे महापालिका आयुक्त अभिजित बांगर, जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी, प्रशांत रोडे, ठाणे महापालिका परिवहन समितीचे सभापती विलास जोशी, राजू मिश्रा, नगर अभियंता प्रशांत सोनाग्रा, पूर्वेश सरनाईक स्थानिक लोकप्रतिनिधी आदी मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री शिंदे पुढे म्हणाले की, सर्व युगांप्रमाणे लता युग हेदेखील अविस्मरणीय आहे. त्यांची गाणी आजही आपल्या जीवनाचा अविभाज्य घटक आहेत. आपल्या सर्वांनाच सकाळी उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत लतादीदींची गाणी हवीहवीशी वाटतात. या विद्यालयाच्या उभारणीसाठी राज्य शासनाकडून २५ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. ठाण्याला संगीत आणि साहित्याचा मोठा वारसा लाभला आहे. संगीत क्षेत्रातील दिग्गज पं.राम मराठे, पी.सावळाराम, श्रीनिवास खळे हे ठाण्यातीलच. भारतीय संगीताचा अनमोल वारसा पुढच्या पिढीला देण्यासाठी स्व.लता मंगेशकर संगीत विद्यालय (गुरूकुल) गायन-संगीतप्रेमींना निश्चितच उपयुक्त ठरेल. या वाटचालीत शासन मंगेशकर कुटुंबियांच्या कायम सोबत असेल.


## भारतीय अर्थव्यवस्थेने घेतली मोठी झेप!

### जीडीपी पहिल्यांदाच चार ट्रिलियन डॉलर्सवर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारत देशाच्या अर्थव्यवस्थेने मोठी झेप घेतली आहे. देशाचा आर्थिक विकास दर (जीडीपी) हा पहिल्यांदाच चार ट्रिलियन डॉलर्सच्या पुढे गेला आहे. यामुळे भारत देश आता ३३३ लाख कोटी रुपयांची अर्थव्यवस्था झाला आहे. एशियानेट वृत्तसंस्थेने याबाबतचे वृत्त प्रसिद्ध केले आहे.

भारताची अर्थव्यवस्था अगदी वेगाने पुढे जात असल्याचा हा पुरावा आहे. आर्थिक वर्ष २०२३-२४च्या पहिल्या तिमाहीत भारताचा जीडिपी ७.८ टक्क्यांनी वाढला आहे. यापूर्वी मोदी सरकारने भारत २०२४-२५ या वर्षापर्यंत चार ट्रिलियन डॉलर्सचा पल्ला गाठेल असा विश्वास व्यक्त केला होता. आता २०२४ हे वर्ष सुरू होण्यापूर्वीच भारतीय अर्थव्यवस्थेने हा टप्पा गाठला.




सध्या ग्लोबल जीडीपीच्या यादीमध्ये अमेरिका पहिल्या क्रमांकावर आहे. त्यापाठोपाठ चीन, जपान आणि जर्मनीचा क्रमांक लागतो. भारताने या यादीमध्ये पाचव्या क्रमांकावर झेप घेत, युनायटेड किंगडमला मागे टाकले आहे. विकासाची गती पाहता पुढील तीन वर्षांमध्ये भारत जर्मनी आणि जपानलाही मागे टाकून जगातील तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था होऊ शकतो, असा अंदाज तज्ज्ञांनी वर्तवला आहे.

## ठाकरी मिरची बाजारात दाखल

### औषधी गुणधर्मामुळे नागरिकांकडून मागणी

**पाली : प्रतिनिधी**

पाली सुधागडसह रायगड जिल्ह्यात ठाकूर व आदिवासी बांधव शेती व डोंगर उतारावर गावठी भाजीपाला लावतात. त्यातील एक महत्त्वाची भाजी म्हणजे ठाकरी मिरची. हे पारंपरिक वाण वैशिष्ट्यपूर्ण आहे, तर वैद्यकीय गुणधर्म आणि अनोख्या चवीमुळे या मिरचीला सर्वत्र खूप मागणी असते. सध्या ही मिरची बाजारात दाखल झाली आहे.



(छाया : धम्मशील सावंत)

> **ठाकरी मिरचीला पेटंट मिळायला हवे तसेच चांगला हमीभाव मिळून हक्काची बाजारपेठ मिळाली पाहिजे. इतर हंगामातही या मिरचीचे उत्पादन घेतले पाहिजे, जेणेकरून आदिवासी समाजाला चांगले उत्पन्न मिळण्यास मदत होईल.**
> **-राजू बांगारे, शिक्षक, सुधागड**

रायगड जिल्ह्यात आदिवासी समाज उदरनिर्वाहासाठी लाकूडतोड, मजुरीबरोबरच डोंगर उतारावर लाल मातीमध्ये भाज्यांची शेती करतो. जूनमध्ये पावसाच्या पाण्यावर ठाकरी मिरचीच्या गावठी वाणाची लागवड आदिवासी बांधव पारंपरिक पद्धतीने करतात. ऑक्टोबरअखेरीस हे पीक हाती येऊ लागते. यंदा या मिरचीचे भरघोस पीक आले असून ठिकठिकाणी आदिवासी महिला गावठी भाज्यांसह ठाकरी मिरची विक्रीसाठी घेऊन येत आहेत.

तिखट असलेली ही मिरची अनेक जण तेलात तळून खातात. हळद, मीठ टाकून सुकवून तसेच लोणचे करूनदेखील ती खाल्ली जाते. आजारपणात तोंडाला चव येण्यासाठी या मिरचीचा ठेचा करून खाल्ला जातो. हा ठेचा मधुमेही व्यक्तींसाठी फायदेशीर असतो. त्यामुळे या मिरचीला नागरिकांकडून मागणी आहे.

## राष्ट्रपती मुर्मू पुणे दौऱ्यावर

**पुणे : प्रतिनिधी**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू नोव्हेंबरच्या अखेरीस पुण्याला भेट देणार आहेत. येथील राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी (एनडीए) आणि सशस्त्र दल वैद्यकीय महाविद्यालयाला (एएफएमसी) त्या भेट देणार आहेत. लष्कराच्या या दोन्ही संस्थांच्या कार्यक्रमात त्या सहभागी होणार आहेत.

यंदा एनडीएच्या १४५व्या तुकडीचा दीक्षांत संचलन सोहळा ३० नोव्हेंबर रोजी होणार आहे. राष्ट्रपती मुर्मू या सशस्त्र दलाच्या सर्वोच्च कमांडर असून या संचलन सोहळ्यात उपस्थित राहून कॅडेट्सच्या वतीने मानवंदना स्वीकारतील. पुढील वर्षी जानेवारीमध्ये या प्रबोधिनीची ७५ वर्षे पूर्ण होणार असून त्या निमित्ताने एनडीएच्या वतीने वर्षभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

## छट्पूजा उत्साहात



**अलिबाग** : येथील समुद्रकिनारी रविवारी छट्पूजा उत्साहात झाली. (छाया : जितू शिगवण)

निवडक

## रिक्षेच्या धडकेत वृद्ध जखमी

**पनवेल :** रिक्षाने धडक दिल्याने ६३ वर्षीय सुरेंद्र कोडीशम आढाव जखमी झाल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी शहर पोलीस ठाण्यात रिक्षाचालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सुरेंद्र आढाव हे रिटायर्ड असून, ते करंजाडे आरथी येथे राहतात. सकाळी वडघर-चिंचपाडा रोडवर मॉर्निंग वॉक करता गेले होते. या वेळी समोरून आलेल्या ऑटो रिक्षाने त्यांना समोरून धडक दिली व ते खाली पडले. या वेळी रिक्षावाला मदत न करता निघून गेला. जवळच असलेल्या वॉचमनने मदत केली.

## हातातील मोबाईल खेचून पलायन

**पनवेल :** चहा पीत असताना ३२ वर्षीय तरुणाच्या हातातून दोन अनोळखी व्यक्तींनी मोबाईल खेचून पळून गेले. याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. सेक्टर ३४ ए, खारघर येथे राहणारा हर्ष राजेश मोंगा किराणा माल भरून व मित्रांसोबत जेवण करून खारघर येथील घरी येण्यासाठी रात्री निघाला. तो गाडीतून खाली उतरून चहा पीत असताना त्याच्या हातात मोबाइल होता. या वेळी मोटरसायकलवरून दोन अनोळखी व्यक्ती आले व त्यांच्या हातातील आयफोन खेचून उत्सव चौकाच्या दिशेने बेलपाड्याकडे पळून गेले. त्यांचा पाठलाग केला, मात्र ते सापडले नाहीत.

## सापडलेला मोबाईल महिलेला सुपूर्द

**पनवेल :** लोकलमध्ये सापडलेला मोबाईल व साहित्य पोलिसांनी महिलेला परत केले. पनवेल येथे राहणाऱ्या प्रेरणा जाधव या १६ नोव्हेंबरला हार्बर मार्गावरून प्रवास करत असताना त्यांच्याकडील प्लास्टिक पिशव्या लोकलमध्ये राहिल्या होत्या. वाशी ते गोवंडीच्या दरम्यान गस्त घालणाऱ्या पोलीस पथकाला त्या सापडल्या. यामध्ये एक मोबाइल व इतर साहित्य होते. पोलिसांनी त्यांना हे साहित्य परत मिळवून दिले.

## रिक्षात विसरलेली बॅग केली परत



**पनवेल :** पनवेल रेल्वे स्टेशन येथे एका व्यक्तीची रिक्षामध्ये बॅग विसरली होती. ती बॅग या व्यक्तीला शहर पोलिसांनी परत केली आहे. एक व्यक्ती पोलीस ठाणे येथे आल्यानंतर रिक्षाचा सीसीटीव्ही फुटेजद्वारे पनवेल शहर पोलीस ठाण्याचे गुन्हे शाखा पथकाचे अंमलदार एच सी वायकर व पोलीस हवालदार महेश पाटील यांनी सीसीटीव्ही फुटेजद्वारे रिक्षाचा शोध घेऊन ही बॅग शोधून दिली व ती संबंधित प्रवाशाची खात्री करून त्यांच्या ताब्यात देण्यात आली आहे.

# पनवेल, उरणसह नवी मुंबईत वाढत्या आगी

## वाढत्या उष्णतेमुळे घटनांमध्ये वाढ; तीस दिवसांत ११ ठिकाणी आग लागण्याचे प्रकार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उन्हाच्या झळा वाढू लागताच नवी आगीच्या घटनांमध्येदेखील वाढ झाल्याचे पाहायला मिळत आहे. पनवेल, नवी मुंबई, उरण परिसरात मागील तीस दिवसांत ११ ठिकाणी आगी लागण्याच्या घटना घडल्या असून, शॉर्ट सर्किटमुळे या आगी लागण्याच्या शक्यता वर्तवण्यात आल्या आहेत. मागील काही दिवसांपासून तीव्र उष्णता जाणवत आहे. वाढत्या उष्म्यामुळे नागरिक हैराण झाले आहेत. दरवर्षी उन्हाळ्यात आग लागण्याच्या घटनांमध्ये वाढ झाल्याचे दिसून येते. काही वेळा मोठ्या दुर्घटनेत जीवित आणि वित्तहानीदेखील होते.



ग्रामीण तसेच शहरी भागांत या कालावधीत आग लागण्याचे प्रकार मोठ्या संख्येने घडतात. पनवेल तालुक्यातील रिटघर गावात बुधवारी (दि.१६) रात्री पावणे एकच्या सुमारास शॉर्ट सर्किटमुळे घराला आग लागल्याची घटना समोर आली आहे. या आगीत घरातील वस्तूंचे मोठे नुकसान झाले असून, घरातील सर्व सामान जळाले आहे. रात्रीची वेळ असल्याने घरातील वस्तू काढता आल्या नाहीत व आग भडकत राहिली. तरी ग्रामस्थ आणि अग्निशामक दलाच्या जवानांनी आग आटोक्यात आणली. तत्पूर्वी, १३ नोव्हेंबर रोजी सानपाडा येथील इमारतीच्या सहाव्या मजल्यावर लागलेल्या आगीत इमारतीमधील साहित्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले, तर १० नोव्हेंबर रोजी पळस्पा फाटा येथील इमारतीच्या १८ व्या मजल्यावर आग लागल्याचा प्रकार घडल्याने आगीवर नियंत्रण मिळवणे अग्निशमन दलाला अवघड गेले होते.

उन्हाळ्यात हे प्रकार घडण्यामागे काही कारणे आहेत. यात शॉर्ट सर्किट हे प्रमुख कारण असल्याचे सांगितले जात उन्हाळ्यात इमारती, घरे, कारखान्यांना आग लागण्याच्या घटनांमध्ये वाढ होताना दिसते. उन्हाळ्यात अन्य घरांच्या तुलनेत स्लॅब आणि पत्र्याची घरे जास्त तापतात. त्यामुळे शॉर्ट सर्किट, अधिक तापमान, गॅसगळती किंवा मानवी चुकीमुळे कागद, प्लॅस्टिकचे साहित्य, रसायने आणि फर्निचर या गोष्टी पटकन पेट घेऊन आग लागण्याची शक्यता असते. उन्हाळ्यात आगीच्या घटना घडू नयेत, यासाठी चिमणी तसेच अन्य उपकरणांचे वेळच्यावेळी सर्व्हिसिंग करून घेणे आवश्यक आहे.

### ३० दिवसांत घडलेल्या घटना

- **१६ नोव्हेंबर– पनवेल तालुक्यातील रिटघर गावात घराला आग.**
- **१३ नोव्हेंबर– नवी मुंबई सानपाडा येथील इमारतीच्या ६ व्या मजल्यावर आग.**
- **१० नोव्हेंबर– पनवेल पळस्पा फाटा येथील इमारतीच्या १८ व्या मजल्यावर आग.**
- **०१ नोव्हेंबर– नवी मुंबई वाशी येथे कारला आग.**
- **३१ ऑक्टोबर– उरण येथील गोदामाला आग.**
- **२९ ऑक्टोबर– कामोठे येथील सेक्टर १९ अक्षर इमारतीच्या १४ व्या मजल्यावर आग.**
- **२९ ऑक्टोबर– नवी मुंबई वाशी एपीएमसी मार्केट मध्ये उभ्या ट्रकला आग.**
- **२७ ऑक्टोबर– उरण येथील अनधिकृत भंगार गोदामाला आग.**
- **२६ ऑक्टोबर– वाशी येथील बॉम्बे एन एक्स इमारतीच्या मीटर बॉक्सला आग.**
- **२६ ऑक्टोबर– वाशी टोल नाक्यावर चारचाकी वाहनाला आग.**
- **१६ ऑक्टोबर– महापे येथील ७ मजली इमारतीला लागलेल्या आगीत ५ वाहनं खाक.**

### विजेचा वाढता वापर

उन्हाळ्यात उष्णतेपासून दिलासा मिळावा, यासाठी बहुतांश लोक पंखे, एसी किंवा कूलरचा वापर करतात. यामुळे वीज यंत्रणेवर लोड वाढतो. त्यामुळे शॉर्ट सर्किट होते. शॉर्ट सर्किटमुळे आगीच्या घटना घडतात. शहरात आग लागण्यामागे हे एक प्रमुख कारण आहे. त्याचप्रमाणे उन्हाळ्यात वाहनांना आग लागण्याच्या घटनादेखील पाहायला मिळतात.









**पनवेल : क्रिकेट वर्ल्डकपचा फिवर देशभरात असून पनवेलमध्येही भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया होणाऱ्या सामन्याचा उत्साह पहायला मिळाला. शहरातील हरी ओम कट्टा या हॉटेलचे मालक प्रशांत कर्पे यांच्या वतीने मोफत तिरंगा बिर्याणीचे वाटप रविवारी करण्यात आले. वर्ल्डकप फायनल मॅचनिमित्त हॉटेलमध्ये येणाऱ्या ग्राहकांना मोफत तिरंगा बिर्याणी देण्यात आली. या उपक्रमाला क्रिकेटप्रेमींसह नागरिकांचा उत्तम प्रतिसाद लाभला.** (छाया : विकास म्हात्रे)

## भाजप नेते अरुणशेठ भगत यांचा वाढदिवस उपक्रमांनी होणार साजरा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांचा येत्या बुधवारी (दि.२२) वाढदिवस आहे. विविध उपक्रमांनी हा वाढदिवस साजरा होणार आहे.

भाजप नेते अरुणशेठ भगत बुधवारी सकाळी ८ वाजेपर्यंत शेलघर येथील निवासस्थानी उपस्थित असतील. ९ वाजता गव्हाण कोपर येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये शैक्षणिक कार्यक्रम. १० वाजता पनवेल येथील मध्यवर्ती पक्ष कार्यालयात उपस्थिती, ११.३० वाजता सुकापूर येथे विविध कामांचे भूमिपूजन व उद्घाटन, दुपारी १२ वाजता भोकरपाडा येथे रस्त्याचे भूमिपूजन, १२.३० वाजता भानघर येथील रस्त्याचे भूमिपूजन व उद्घाटन, १ वाजता करूणेश्वर वृद्धाश्रमाला भेट, ३ वाजता पुन्हा पक्ष कार्यालय भेट व ६ वा. शेलघर निवासस्थानी उपस्थिती असा दिनक्रम आहे.





**उलवे नोड : आपल्या पतीला दीर्घायुष्य लाभो व संसार सुखाचा होवो यासाठी उत्तर भारतीय समाजात महिलांकडून छट्पूजा केली. या पूजेच्या पार्श्वभूमीवर भारती सामाजिक संस्था, उलवेच्या वतीने रविवार व सोमवारी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.**











**कामोठे : कै. बळीराम राघो पावणेकर सार्वजनिक वाचनालय आणि ग्रंथालय तसेच झेंडा सामाजिक संस्थेच्या वतीने १२ व्या आगरी कराडी कामोठ्याचा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाचे उद्घाटन भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते रविवारी झाले.** (छाया : अक्षय शार्दुल)

## उरण मोरा रोडवर धोकायदायक डीपी

**उरण : वार्ताहर**

उरण शहर हद्दीतील उरण मोरा रोडवरील भोवरा तलाव समोरील विजेचे डीपी उघडी आहेत. गेले कित्येक दिवस हे डीपी उघडी असल्याने जीवित हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या गंभीर समस्येकडे वीज वितरण कंपनीने लक्ष द्यावे, अशी मागणी होत आहे.

याचप्रमाणे उरण शहरात ठीक-ठिकाणी विजेच्या डीपी उघडी असल्याचे चित्र दिसत आहेत. वीज मंडळ अधिकारी यांनी लक्ष देऊन उघड्या डीपींना लवकरात लवकर झाकण बसवावे आणि होणारा अनर्थ टाळावा, अशी मागणी जनतेतून होत आहे.



## भाजप जसखार गाव अध्यक्षपदी अक्षय घरत

**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील जसखार गाव अध्यक्षपदी अक्षय प्रभाकर घरत यांची नियुकीपदी नुकतीच निवड करण्यात आली आहे. नियुक्तीचे पत्र भाजपचे उरण तालुका अध्यक्ष रवी भोईर यांनी देऊन अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

आमदार महेश बालदी, उरण शहर भाजप अध्यक्ष तथा नगरसेवक कौशिक शाह यांनीही अक्षय घरत यांचे अभिनंदन केले आहे. नियुक्तीपत्र देतेवेळी भाजप उरण तालुका सरचिटणीस कैलास भोईर, जसखार ग्रामपंचायत माजी सरपंच दामूशेठ घरत, माजी बूथ अध्यक्ष प्रेम मढवी, सुरज कडू, विशाल ठाकूर, विशाल तांडेल, मितेश घरत, वैभव घरत, हरेश घरत, परेश भोईर, साहिल घरत, आदेश पाटील, अनिल ठाकूर आदी उपस्थित होते.



## 'दिवाळीनिमित्त ओरायन मॉलची ग्राहकांना अनोखी भेट'





**पनवेल : वार्ताहर**

दिवाळीच्या सणानिमित्त ओरायन मॉलमध्ये खरेदी करणाऱ्या ग्राहकांसाठी अत्यंत महागडी अशी बक्षीसे देऊन दिवाळीची अनोखी भेट दिली आहे, असे प्रतिपादन सुप्रसिद्ध रात्रीस खेळ चाले या मालिकेत शेवंताची भूमिका करणाऱ्या अपूर्वा नेमळेकर यांनी विजेत्या ग्राहकांना बक्षीस देताना केले.

या वेळी सुप्रसिद्ध अभिनेत्री अपूर्वा नेमळेकर यांच्यासह ओरायन मॉलचे मालक मंगेश परुळेकर, दिलीपभाई करेलिया, मनन परुळेकर यांच्यासह ओरायन मॉलचे अधिकारी व कर्मचारी या वेळी उपस्थित होते.

ओरायन मॉलचे कौतुक करताना अपूर्व नेमळेकर यांनी सांगितले की, नामांकित कंपन्यांचे आऊटलेट येहे ग्राहकांना खरेदी करण्यासाठी उपलब्ध आहेत त्यामुळे त्यांना वाशी किंवा मुंबईला खरेदी करण्यासाठी जाण्याची गरज नाही. मंगेश परुळेकर व त्यांची टीम वर्षभर ग्राहकांसाठी वेगवेगळ्या ऑफर, स्कीम राबवत असतात मी अनेक मॉल पहिले, पण हा एक वेगळ्या धाटणीचा मॉल आहे. येथे ग्राहक आल्यावर तो रिकाम्या हाताने परत जात नाही हि यांची खासीयत असल्याचे त्यांनी सांगितले.

यानिमित्ताने त्यांच्या हस्ते शॉप अँड विन कॉन्टेस्टचा लकी ड्रॉ काढण्यात आला. त्यामध्ये प्रथम पारितोषिक होंडा कंपनीची बाईक तुषार याला देण्यात आली तर द्वितीय आय फोन प्रो १५ बालटू यादव याला मिळाले तर तृतीय पारितोषिक ॲपल वॉच स्वराज (कर्जत) याला मिळाले आहे. त्याचबरोबर यावर्षी विक्रम लँडर येथे हुबेहूब साकारण्यात आले होते. हे पाहण्यासाठी पनवेलकरांनी मोठी गर्दी केली होती.

## भात खरेदी केंद्राची मागणी

**उरण : रामप्रहर वृत्त**

उरण तालुक्यात प्रामुख्याने भात पीक घेतले जाते. यंदाही तालुक्यातील दोन हजार ४३५.८५ हेक्टरवर भाताचे पीक घेण्यात आले आहे.

गतीवर्षीच्या तुलनेत हे प्रमाण अधिक असून थोड्या प्रमाणात मळणीचे कामे बाकी असल्याचे कृषी विभागातून सांगण्यात आले आहे, मात्र भाताच्या पिकात वाढ होऊनही उरण तालुक्यात भात खरेदी-विक्री केंद्र सुरू झालेले नाही. त्यामुळे पिकविलेल्या धान्याला योग्य भाव मिळत नसून दलालांना स्वस्तदरात धान्य विकावे लागत असल्याने बळीराजा संकटात आला आहे.

उरण तालुक्यात अजूनही भात खरेदी केंद्र सुरू झाले नसल्याने शेतकऱ्यांना भात विकण्यात अडचणी येत आहेत. त्यामुळे भात खरेदी केंद्र सुरू करण्याची मागणी होत आहे.

## पनवेल शहर पोलिसांचा प्रामाणिकपणा

### हरवलेली बॅग मालकाला सुपूर्द

**पनवेल : वार्ताहर**



पनवेल शहर पोलिसांच्या प्रामाणिकपणाचे कौतुक होत असून त्यांच्या पोलीस शिपायाला बेवारस स्थितीत मिळालेली हॅन्डबॅग त्यांनी या मालकाला संपर्क साधून परत केली आहे.

पनवेल शहर पोलीस ठाण्याचे नेमणुकीस असलेले पोलीस शिपाई सुखदेव वाणी हे रात्रपाळी कर्तव्यावर असताना त्यांना गार्डन हॉटेल येथे पहाटे एक वाजेच्या सुमारास एक हँड पर्स मिळून आली असता त्यांनी ही पर्स उघडून पाहणी केली असता, त्यामध्ये काही रक्कम व विवो कंपनीचा मोबाईल व शरद रघुनाथ सावंत राहणार डोंबिवली ठाणे या नावाचे आधार कार्ड मिळून आले.

शरद सावंत यांचा संपर्क क्रमांक वरती सुखदेव वाणी यांनी संपर्क करून त्यांच्याकडे विचारपूस केली असता त्यांनी सांगितले की, ते स्वतः व त्यांचा कर्मचारी अजय बाळाराम गायकर (रा. नारपोली, ठाणे) हे दोघे बाईकवरून पनवेल ते कळंबोली असा प्रवास करत असताना त्यांची हॅन्ड बॅग पडली असल्याचे त्यांनी सांगितल्याने. त्यानुसार अक्षय बाळाराम गायकर हे स्वतः पोलीस ठाण्यात येऊन त्यांनी त्यांचे मालक शरद रघुनाथ सावंत यांची हरवलेली बॅग ताब्यात घेऊन चेक केले असता त्यामध्ये त्यांनी ठेवलेले २५ हजार रोख रक्कम विवो कंपनीचा मोबाईल व आधार कार्ड मिळून आले. त्यांचा मुद्देमाल त्यांना मिळून आल्याने ही हॅन्डबॅग त्यांच्या ताब्यात कर्तव्यावर असलेल्या पोलीस उपनिरीक्षक प्रियांका शिंदे यांच्या उपस्थितीत देण्यात आली. कर्तव्यदक्ष पोलीस शिपाई सुखदेव वाणी यांनी मिळून आलेली वस्तू प्रामाणिकपणे परत दिल्याने त्यांचे अभिनंदन होत आहे.

## संपादकीय

# तंत्रज्ञानाचा गैरवापर

मानवी प्रगतीसाठी विज्ञान-तंत्रज्ञान उपयुक्त मानले जाते. त्याच्या जोरावर विविध क्षेत्रांमध्ये उन्नती झालेली दिसून येते, मात्र हेच तंत्रज्ञान गैरवापरामुळे किती घातक ठरू शकते हे 'डीपफेक' प्रकारांतून नुकतेच समोर आले आहे. त्यामुळे भारतासह जगभर चिंता व्यक्त होत आहे.

**तंत्रज्ञानाचा गैरवापर करून बॉलीवूड अभिनेत्री रश्मिका मंदानाचा एक आक्षेपार्ह व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला. यामध्ये चेहरा रश्मिकाचा होता, मात्र उर्वरित शरीर दुसऱ्या महिलेचे होते, पण ती महिला रश्मिकाच आहे इतका हुबेहूब व्हिडीओ बनविण्यात आला होता. वास्तविक झारा पटेल या इन्स्टाग्रामवर सक्रिय असलेली ब्रिटिश-भारतीय तरुणीचा हा मूळचा व्हिडीओ, पण तो बदलून अभिनेत्री रश्मिकाची बदनामी करण्यात आली. त्यानंतरही इतर सेलिब्रिटींच्या बाबतीत असे प्रकार सुरू आहेत. अलिकडच्या काळात एआय अर्थात आर्टिफिशिअल इंटेलिजन्स हे नवे माध्यम तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात आले आहे. या माध्यमातून फोटो, व्हिडीओ, ऑडिओ अशा सर्व बाबी हाताळल्या जातात. एआयचे अनेक फायदे असले तरी अशा प्रकारे त्याचा गैरवापर होत असल्याने ते अत्यंत धोकादायक आहे. डीपफेकद्वारे एखाद्या फोटोत किंवा व्हिडीओमध्ये प्रत्यक्ष संबंधित व्यक्ती हजर नसली तरी तिच्या चेहऱ्याचा फोटो अथवा व्हिडीओ दुसऱ्या व्यक्तीच्या चेहऱ्यावर तंत्रज्ञानाच्या सहाय्याने लावता येतो. याचा वापर अश्लील व्हिडीओ बनविण्यासाठी मोठ्या प्रमाणात केला जात आहे. विशेष म्हणजे महिला, मुली या तंत्रज्ञानाच्या सर्वाधिक बळी पडताना दिसत आहेत. मध्यंतरी अभिनेत्री रश्मिका मंदानाचा बनावट व्हिडीओ आला. त्यानंतर मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरची मुलगी साराचा क्रिकेटपटू शुबमन गिलसोबत एकत्र फोटो आला. वरिष्ठ अभिनेत्री काजोललाही या प्रकारामुळे मनस्ताप सहन करावा लागला. पोर्नोग्राफिक व्हिडीओमध्ये याचा सर्रास वापर केला जातो. याखेरिज महिलांना ब्लॅकमेल करून खंडणी मिळविण्याचाही प्रयत्न होतो. त्यामुळे अनेक स्त्रियांना मानसिक त्रासाला सामोरे जाण्याची वेळ आली आहे. या वाढत्या प्रकाराची दखल केंद्रातील सरकारने घेतली आहे. डीपफेक मुद्द्यावर सरकार लवकरच सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सबरोबर चर्चा करणार आहे. या संदर्भात तंत्रज्ञानमंत्री अश्विनी वैष्णव यांनी, डीपफेकविरोधात योग्य पावले उचलली नाहीत, तर आयटी कायद्यांतर्गत त्यांना संरक्षण मिळणार नाही, अशी सूचना सोशल मीडिया कंपन्यांना केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही यावर भाष्य करीत सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. डीपफेक हे एक मोठे संकट असून याबद्दल आपण लोकांना शिक्षित केले पाहिजे, असे आवाहनही त्यांनी माध्यमांना केले आहे. पंतप्रधानांनी नेमका मुद्दा अधोरेखित केला आहे. याविषयी नागरिकांमध्ये माध्यम साक्षर करणे आवश्यक आहे, कारण या संदर्भात जोपर्यंत कडक नियमावली येत नाही तोपर्यंत अशा प्रकारांना थेट रोखता येणार नाही. अनेक गोष्टी या आंतरराष्ट्रीय पातळीवर होत असतात. त्यास इथून नियंत्रित करणार येत नाही, परंतु अशा गंभीर बाबींवर जागतिक स्तरावर एकत्र येऊन ठोस उपाययोजना करणे काळाची गरज आहे. शेवटी जरी हे तंत्रज्ञानातून होत असले तरी तंत्रज्ञान मानवानेच तयार केले आहे. त्यामुळे कोणत्याही नव्या तंत्रज्ञानाची पूर्ण पडताळणी केल्याशिवाय त्याच्या वापरास परवानगी देता कामा नये. मुख्य म्हणजे त्याचे चांगले-वाईट परिणाम ध्यानात घेऊन त्यात आवश्यक ते बदल तसेच अटी-शर्थी लागू करून मगच ते कार्यान्वित करणे उचित ठरेल.**

# यंदाही बळीराजावर 'अवकाळी'चे संकट





**खबरबात**
विजय मांडे

आपला भारत देश कृषी प्रधान देश म्हणून सर्व जगात ओळखला जातो ज्या शेतकऱ्यामुळे भारताची ओळख आहे. तोच कित्येक वर्षे अडचणींशी सामना करीत जीवन जगत आहे. लहरी हवामान, भेसळ बियाणे, मजुरांची वानवा आदी अडचणींमुळे शेतकरी अगदी मेटाकुटीस आला आहे. रायगड जिल्हा भाताचे कोठार म्हणून ओळखले जाते, मात्र आता सारे काही बदलले आहे. भात बियाणांची पैदास करणारे कोंकण कृषी विद्यापीठाचे प्रादेशिक कृषी केंद्र आपल्या जिल्ह्यातील कर्जतमध्ये आहे, मात्र अडचणींवर मात करताना शेतीवरील नव नवीन प्रयोग करण्याची हिंमत शेतकऱ्यांमध्ये नाही. अर्थात काही शेतकरी त्याला अपवाद असतील. त्यामुळे कितीही योजना आणा, कर्ज माफी करा तरी बळीराजाची पीडा काही संपत नाही. यंदा पाऊस उशीरा सुरू झाला तरी भाताचे पीक एकदम चांगले होते मात्र दिवाळीपूर्वी अवकाळीने हे तयार पीक पाण्यात घालवले त्यामुळे बळीराजाची संकटातून सुटका नाही हे कटू सत्य आहे.

कर्जत तालुक्याविषयी बोलायचे झाले तर तालुक्यात औद्योगिक कारखाने नाहीत, मात्र सुरुवातीला मुंबईकरांनी जमिनी घेऊन फार्म हाऊस तयार केले आणि शोकांतिका अशी की, ज्या शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी 'मुंबईकर शेतकऱ्यांना' विकल्या त्यांच्या तयार झालेल्या फार्म हाऊसवर रखवालदार म्हणून काम करावे लागत होते. अजूनही काही मूळचे शेतकरी त्यांच्या फार्म हाऊसवर काम करीत आहेत. कारण शेती विकून आलेले पैशातून नवीन घर बांधले. चारचाकी गाडी घेतली. मुला-मुलींचे विवाह अगदी धुमधडाक्यात लावले व पैसा संपला आणि हो अजून एक महत्त्वाचे कारण म्हणजे काही शेतकरी अशिक्षित त्यांची मुलांना आपसूकच अमाप पैसे मिळाल्याने हे पैस घेऊन कुणी लेडीज बार तर कुणी बारमध्ये जाऊन पैशांची उधळपट्टी करू लागले व आपले जीवन उद्ध्वस्त करून बसले. काळानुरूप आता बदलत होत चालले आहे. त्याचे एकमेव कारण म्हणजे शेतकऱ्यांची मुले शिकू लागली आणि काहींनी आपल्या जमिनीवर रिसॉर्ट किंवा फार्म हाऊस सुरू केले आहेत. आत्ताच्या घडीला सुमारे दोन हजार फार्म हाऊस तालुक्यात आहेत.

कर्जत तालुक्यात पन्नास-साठ वर्षांपूर्वी पाण्याचे दुर्भीक्ष होते. प्यायला सुद्धा पाणी मिळवता-मिळवता घरातील महिलांच्या डोळ्यात पाणी यायचे. त्यावेळी गावागावात 'टिपळूण' येत असे आणि हंड्याभर पाण्यासाठी रात्र रात्र जगावे लागते असे, मात्र १९६०च्या दरम्यान राजानाला कालवा सुटू झाला आणि त्या परिसरातील शेतीचे बरेचसे क्षेत्र सिंचनाखाली आले. त्यामुळे शेतकऱ्यांच्या तोंडावर हासू आले. पाणी टंचाई दूर झाली. केवळ पावसाळ्यात भात पीक घेणाऱ्या शेतकऱ्यांना दुबार भात शेती करण्याची संधी मिळाली आणि शेतकऱ्यांच्या कष्टाचे चीज होऊ लागले. लहरी हवामानापेक्षा उन्हाळी भात शेतीचे उत्पन्न दोन - अडीच पट मिळू लागले. अशाच प्रकारे नेरळ मधील अवसरे भागातही सिंचनासाठी पाणी उपलब्ध झाले आणि त्या परिसरातही दुबार भात शेतीचे उत्पन्न मिळू लागले.

काही वर्षांपूर्वी राजानाला दुरुस्तीचे काम हाती घेतले ते नियोजना अभावी वेळेत पूर्ण झाले नाही. त्यामुळे कालव्याला पाणी मिळत नसल्याने शेतकऱ्यांनी दुबार भात शेती करणे बंद केले. काही शेतकऱ्यांनी कडधान्य तर काहींनी टोमॅटो, कलिंगड, भाजीपाला अशी शेती करण्यास सुरुवात केली तर काहीजण कोहळ्याची, केळीची, हळदीची शेती करण्यासाठी पुढे येत आहेत. या शेतकऱ्यांची संख्या दहा टक्केपण नाही. त्यामुळे भाताचे पीक घेणारे शेतकरी अडचणीत आले. मजुरांची वानवा, मोकाट गुरांचा प्रश्न उदभवू लागला. या वेळी पावसाचा तडाखा बसू लागला. यंदा तर आधी पाऊस लांबणीवर गेल्यामुळे पेरलेले भात बियाणे पक्षांनी फस्त केले. नंतर पेरलेले बियाणे भरपूर पाऊस पडल्याने वाहून गेले. त्यामुळे शेतकऱ्यांची इकडे आड तिकडे विहीर अशी परिस्थिती होऊ लागली. सततच्या नुकसानीमुळे युवा पिढी शेतीपासून दूर जाऊ लागली. त्यामुळे अनेकांची शेती ओसाड होऊ लागली.

भात संशोधन केंद्र कर्जतमध्ये आहे. त्याचा लाभ ठराविक शेतकरी घेताना दिसतात याचे कारण युवा पिढीला शेतीबद्दल आस्था नाही. त्यामुळे सर्व उपलब्धता असताना शेतीतील उत्पन्न कमी होत आहे. शासकीय योजना आहेत, परंतु त्याचा लाभ शेतकऱ्यांना होत नाही. काही हुशार शेतकरी लाभ करून घेतात. घरातील वय झालेल्या शेतकऱ्यांचा आपली काळी आई विकण्यास विरोध आहे, मात्र शेती ओसाड ठेवण्यापेक्षा विकून टाकण्याकडे त्या घरातील युवा पिढीचा कल आहे. जमीन विकताना अनेक अडचणी येतात त्यातच वारस हक्काच्या हिश्यासाठी भाऊ-बहिणींमध्ये वाद आहेत. त्यामुळे कोर्ट कचेऱ्या सुरू असल्याने अनेकांची रक्षा बंधने व भाऊबीजा कायमच्या बंद झाल्या आहेत. विशेष म्हणजे कोकणातील शेतकऱ्यांना कितीही अडचणी आल्या आणि पीक आले नाही तरी कोकणातील शेतकरी मनाने खचत नाही. उलट नाव नवीन प्रयोग करून मार्ग काढत असतो आणि त्यातून नवीन उत्पादन काढत असतो म्हणूनच कोकणातील शेतकरी आत्महत्या करण्याचा भानगडीत पडत नाही. अगदी मोजकेच शेतकरी कृषी विभागाकडे जात असतात आणि योजना समजून घेऊन त्याचा लाभ घेत असतात. त्यामुळे युवा पिढी शेती बरोबरच कृषी पर्यटनाकडे आकर्षित होत असताना दरवर्षी तयार पिकावर अवकाळीचे पाणी पडते व हाता तोंडाशी आलेला घास जातो. त्यामुळे शेतीकडे वळणाऱ्या युवा पिढी पुढे प्रश्न निर्माण होत आहे. यंदा तर काही शेतकऱ्यांनी तयार भात पीक कापून आणले, परंतु दोन-तीन दिवस अवकाळी पावसाने ते पीक पाण्यात गेले आहे.

अवकाळीने भात पिकाचे नुकसान झाले की, नुकसानभरपाईचे पंचनामे करण्यासाठी शेतकरी संघटना, राजकीय पक्ष, शेतकऱ्यांना तहसीलदारांना निवेदने द्यावी लागतात. त्यानंतर सात-आठ दिवसांनी पंचनाम्यांची सुरुवात होते. सध्या पंचनामे करण्यासाठी कृषी, महसूल विभागाचे कर्मचारी शेताच्या बांधावर गेले आहेत. गेली सहा-सात वर्षे अवकाळीचा शेतकऱ्यांना सामना करावा लागत आहे. प्रत्येक वेळी नुकसान भरपाई देताना सरकारचे आर्थिक गणितही बिघडत आहे. हे मात्र खरे...



## बदलते तंत्रज्ञान

# १२३४५६सारखा पासवर्ड एका सेकंदात होतो क्रॅक



देशात सायबर क्राईमच्या घटना झपाट्याने वाढत आहेत, अशा परिस्थितीत सतर्क राहणे आणि मजबूत पासवर्ड तयार करणे, ही सर्वांत महत्त्वाची गोष्ट आहे. फक्त एक स्ट्राँग पासवर्ड तुमचे पर्सनल आणि सोशल अकाउंट सुरक्षित ठेवण्यास मदत करू शकतो, परंतु पासवर्ड तयार करताना, लोक सहसा इतका सोपा पासवर्ड तयार करतात की, तो क्रॅक करणे हॅकर्ससाठी फक्त १ सेकंदाचा खेळ आहे.


NordPass च्या रिपोर्टनुसार, जवळपास २० पासवर्ड असे समोर आले आहेत, जे भारतीय सामान्यतः सर्वात जास्त वापरतात. यासोबतच हे पासवर्ड क्रॅक करण्यासाठी हॅकर्सना किती वेळ लागतो, याचाही रिपोर्टमध्ये उल्लेख आहे. रिपोर्टनुसार, १२३४५६, admin, १२३४५६७८, १२३४५, password, १२३४५६७८९, १२३४५६७८९०, administrator, Password असे काही पासवर्ड आहेत, जे हॅकर्सना क्रॅक करण्यासाठी १ सेकंद लागतो.

याचबरोबर, admin123 आणि Password123 क्रॅक करण्यासाठी ११ सेकंद आणि २ मिनिटांपेक्षा कमी वेळ लागतो. Pass123 असा पासवर्ड ५ मिनिटांत क्रॅक होऊ शकतो, तर Welcome123 हा पासवर्ड १० मिनिटांत क्रॅक होऊ शकतो. याशिवाय Pass1234, Abcd1234, Abcd123, UNKNOWN सारखे पासवर्ड १७ मिनिटांत क्रॅक होतात. तसेच, रिपोर्टनुसार, admin123 असा पासवर्ड ३४ मिनिटांत, India123 हा पासवर्ड तीन तासांत आणि Admin123 असा पासवर्ड १ वर्षात क्रॅक होऊ शकतो.

**असा तयार करावा सुरक्षित पासवर्ड**

जेव्हाही पासवर्ड बनवला जातो, तेव्हा मनात एकच प्रश्न फिरू लागतो की एक मजबूत पासवर्ड कसा बनवायचा, जो खाते हॅकर्सपासून सुरक्षित ठेवण्यास मदत करेल. तुमच्या अकाउंटसाठी पासवर्ड तयार करताना फक्त स्मॉल कॅरेक्टरचा (अक्षरे) वापर नाही, तर कॅपिटल कॅरेक्टरचाही वापर करावा. इतकेच नाही तर एक मजबूत पासवर्ड तयार करण्यासाठी सिंबल, नंबर इत्यादी वापरा आणि इतका मजबूत पासवर्ड तयार करा की, हॅकर्स सहजपणे क्रॅक करू शकत नाहीत.

# मराठी संशोधक यशवंत देशपांडे



**निमित्त**

यशवंत खुशाल देशपांडे ख्यातनाम मराठी संशोधक, विदर्भातील अमरावती जिल्ह्यातील पापळ ह्या गावी त्यांचा जन्म १४ जुलै १८८४ रोजी झाला. त्यांचे वडील खुशालराव हे अकोला जिल्ह्यातील धनज ह्या गावी सब-रजिस्ट्रारच्या हुद्यावर होते. यशवंतरावांचे प्राथमिक शिक्षण धनज येथेच झाले. यशवंत खुशाल देशपांडे यांचा आज स्मृतीदिन आहे. त्यानिमित्त जाणून घेऊया त्यांच्या विषयी या लेखातून...

माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षण त्यांनी अनुक्रमे अमरावती आणि मुंबई येथे घेतले. मुंबई विद्यापीठाच्या एम्. ए. व एल्एल. बी ह्या पदव्या मिळविल्यानंतर यवतामाळ येथे त्यांनी वकिली सुरू केली. १९४० पर्यंत ते ह्या व्यवसायत होते.

मुंबईस महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना रामकृष्ण गोपाळ भांडारकर आणि इतिहासाचार्य राजवाडे ह्यांच्या कार्याने ते प्रभावित झाले होते. तो संस्कार बलवत्तर ठरून ते संशोधनकार्याकडे वळले. १९२६ साली यवतमाळ येथे 'शारदाश्रम' नावाची एक संस्था स्थापन करून त्यांनी संशोधन, संग्रहादी कार्यांसाठी सुविधा निर्माण केली. भारतभर संचार करून मठमंदिरांतून संस्कृत-मराठी ग्रंथ, ऐतिहासिक कागदपत्रे, शिलालेख, ताम्रपट, नाणी, मूर्ती, छायाचित्रे इ. ऐतिहासिक संशोधनाची साधने त्यांनी मोठ्या प्रमाणावर जमविली. प्राचीन आणि मध्ययुगीन इतिहासावर नवा प्रकाश टाकणारे अनेक शोधनिबंध त्यांनी लिहिले. 'शारदाश्रम' तर्फे निघालेल्या शारदाश्रम वार्षिकाचे (१९३३) ते संपादक होते. थिऑसाफिकल सोसायटी आणि प्राच्यविद्यापरिषद ह्यांच्या कार्यातही त्यांनी रस घेतला. १९३९ मध्ये झुरिक येथे झालेल्या जागतिक इतिहास परिषदेत भारताचे प्रतिनिधित्व करण्याचा मान त्यांना लाभला होता. ब्रूसेल्स येथे झालेल्या प्राच्यविद्यापरिषदेलाही ते गेले होते. रॉयल एशियाटिक सोसायटी ऑफ ग्रेट ब्रिटन ह्या संस्थेचे सन्मान्य सदस्यत्व त्यांना देण्यात आले होते.

महानुभाव पंथासंबंधी त्यांनी केलेल्या संशोधन-लेखनाबद्दल ते विशेष प्रसिद्ध आहेत. महानुभाव वाङ्मयाचा साकल्याने परिचय घडवून आणण्याच्या हेतूने त्यांनी महानुभावीय मराठी वाङ्मय (१९२६) हा ग्रंथ लिहिला. त्यासाठी केवळ महाराष्ट्रात नव्हे, तर अगदी पंजाब, पेशावरपर्यंत त्यांनी प्रवास केला विविध महानुभाव मठांना भेटी देऊन आणि त्या पंथातील अनेक महंतांशी संपर्क साधून माहिती गोळा केली. महानुभावांचे अनेक ग्रंथही पाहिले. श्रीऋद्धिपुरवर्णन (१९२९), श्री चक्रपाणी-चरित्र (१९३६), पंडित भीष्माचार्यसंकलित निरूक्तशेष ह्यांसारख्या महानुभावीय ग्रंथाचे त्यांनी संपादन केले आहे. विदर्भातील ऐतिहासिक लेखांचा एक संग्रहही त्यांनी संपादिला आहे (१९५९). माझी शांती ही एक कादंबरीही त्यांनी लिहिली आहे.

१९४५ मध्ये नागपूर विद्यापीठात हस्तलिखित संग्रह करण्याची योजना डॉ. देशपांडे यांच्या प्रोत्साहनाने अस्तित्वात आली. त्यांनी वर्षभर विनावेतन, वऱ्हाड व त्याच्या बाहेर प्रवास करून सुमारे २००० हस्तलिखित ग्रंथ एकत्रित करून विद्यापीठाच्या स्वाधीन केले. त्यामुळे विद्यापीठात संशोधन वाङ्मयाच्या कार्याला चालना मिळाली.

डॉ. देशपांडे यांना संस्कृत, हिंदी, उर्दू, फारशी, प्राकृत, अर्धमागधी अपभ्रंश भाषाज्ञान होते. यादवांनंतर ६०० वर्षे मुस्लिमांचा अंमल वऱ्हाडावर होता. त्यामुळे जुने कागदपत्र बहुतेक पर्शियन भाषेत होते. ही ऐतिहासिक कागदपत्रे त्यांनी 'शारदाश्रमा'त संकलित केली. त्यासाठी त्यांनी उर्दू व पर्शियन भाषेचा अभ्यास केला. त्यांनी युरोपात जाण्यापूर्वी फ्रेंच भाषेचा अभ्यास केलेला होता.

नागपूर येथे ते २० नोव्हेंबर १९७० रोजी निवर्तले. यवतमाळ येथील शारदाश्रम त्यांच्या प्रेरणास्त्रोत म्हणून आज अस्तित्वात आहे.

**(साभार : विश्वकोष मराठी व महाराष्ट्र नायक)**

**क्लिक...क्लिक...!**



**मुरूड : येथे नाताळच्या सुट्टीत पर्यटकाची सुक्या मासळीची मागणी वाढते. म्हणून कोळी महिला आतापासूनच खार लावलेली मासळी सुकवून साठा करण्यात मग्न आहेत. ही मासळीची चव व टिकण्यासाठी चांगली असते.** (छाया : सुधीर नाझरे)

## आरोग्य प्रहर

# गुळाच्या चहाचे पाच आरोग्यदायी फायदे

सध्या रस्त्यावर बघाल तिथे तुम्हाला 'गुळाच्या चहाची' टपरी दिसेल. आयुर्वेदामध्ये गुळाला गुणकारी म्हटले असून, गुळाचा चहा हा साखरेच्या चहापेक्षा फारच चांगला असतो असे सध्या म्हटले जाते आहे. त्यासाठी कारणदेखील तसेच आहे. गुळाचा चहा तुमच्या पचनासाठीदेखील उपयुक्त असतो. तुमची पचनशक्ती वाढवण्यास मदत करू शकतो. त्यासोबतच या चहातून मिळणारी उब ही तुमच्या शरीरातील थकवा दूर करण्याचेदेखील काम करते, असे वेबएमडीच्या थशलचऊएका लेखात लिहिले आहे, पण चहामध्ये साखरेऐवजी गूळ घालून पिण्याचे काही विशेष फायदेसुद्धा आहेत, ते नक्की कोणते आहेत ते बघूया.



**१. पचनासाठी उपयुक्त :** गुळाचा चहा पिण्याने अपचनाच्या समस्या दूर राहण्यास मदत होऊ शकते. त्यामुळे गुळाच्या चहाने पचनक्रिया सुधारून, पोटाच्या अपचनाचा त्रास कमी होण्यास मदत होऊ शकते.

**२. पाळीदरम्यान उपयुक्त :** मासिकपाळीदरम्यान गुळाचा चहा पिणे उपयुक्त ठरू शकते. गुळात असणाऱ्या पोषक घटकांमुळे व्यक्तीला अशा दिवसांमध्ये आराम मिळू शकतो. या काळात पोट दुखत असेल किंवा अस्वस्थ वाटत असेल तरीही गुळाच्या चहाचा उपयोग केला जाऊ शकतो.

**३. वजन कमी करणे :** गुळामध्ये पोटॅशिअम भरपूर प्रमाणात असल्याने चयापचयाची क्रिया शीिंरलेश्रळीा सुधारून वजनावर नियंत्रण मिळवण्यास मदत होऊ शकते. म्हणजेच वजन कमी करण्यासाठीदेखील गुळाचा चहा उपयोगी ठरू शकतो.

**४. डिटॉक्स :** गुळाचा वापर शरीरातील अनावश्यक कचरा बाहेर काढण्यासाठी बॉडी डिटॉक्स केला जाऊ शकतो. गूळ हा नैसर्गिकरित्या श्वसनमार्ग, अन्ननलिका, पोट इत्यादी अवयवांची काळजी घेत असतो. त्यामुळे पोटातील अनावश्यक घटक शरीराबाहेर टाकून देऊन, गूळ पोटाचे आणि शरीराचे आरोग्य सुधारण्यास मदत करू शकतो.

**५. प्रतिकारशक्ती वाढवणे :** गुळामध्ये असणारी जीवनसत्वे, खनिजे आणि पोषक घटकांमुळे सहाजिकच गूळ आपल्या शरीराची रोगप्रतिकारकशक्ती वाढवण्यास मदत करू शकतो. म्हणून गुळाचे सेवन केल्याने आपले शरीर लहान-लहान त्रासांपासून आपला बचाव करण्यासाठी सक्षम होण्यास मदत होऊ शकते.

**(टीप : वरील लेख हा मिळवलेल्या माहितीवर आधारित असून, कृपया यास वैद्यकीय सल्ला समजू नये.)**

# माथेरानमध्ये व्यावसायिकांची दिवाळी जोरात

**माथेरान : रामप्रहर वृत्त**

दिवाळीचा पहिला दिवस झाल्यानंतर मुंबई, पुण्यासह विविध जिल्ह्यातील पर्यटकांची पावले माथेरानकडे वळली आहेत. दररोज हजारोंच्या संख्येने पर्यटक दाखल झाले होते. त्यामुळे येथील छोट्या मोठ्या व्यावसायिकांसह येथे हॉटेल, लॉजिंग व्यावसायिकांची दिवाळी चांगली झाली आहे.

दिवाळीच्या पहिल्या दिवशी अभ्यंगस्नान झाल्यानंतर अनेकांनी पर्यटनासाठी बाहेर पडणे पसंत केले. त्यामुळे प्रदूषणमुक्त माथेरान पर्यटनस्थळी पर्यटकांनी गर्दी केली होती. मागील आठवडाभर दररोज हजारोंच्या संख्येने पर्यटक माथेरान शहरात दाखल होत आहेत. येथील सर्व मुख्य पॉईंट्स यामध्ये एको पॉईंट, शारलोट तलाव, मंकी पॉईंट, वन ट्री हिल पॉईंट, लॉर्ड पॉईंट, सनसेट पॉईंट तर येथील मुख्य बाजारपेठेमध्ये पर्यटकांची तुफान गर्दी पहावयास मिळत होती.



## सुट्ट्यांमध्ये पर्यटकांची तोबा गर्दी

सर्वत्रच तुफान गर्दीने नंदनवन फुलून गेले होते. सकाळच्या वेळी घोडेस्वारी करताना पर्यटक दिसत होते, तर काही पर्यटक येथील लाल मातीच्या रस्त्यावरून, गर्द वनराईतून निसर्गाच्या सान्निध्यात भटकंती करीत होते. दररोज हजारोंच्या संख्येने दाखल होणाऱ्या पर्यटकांना माथेरान पालिकेकडून योग्य सेवा सुविधा पुरविण्यात आल्या.

या दिवाळी हंगामात येथील हॉटेल्स, लॉज हे पूर्ण क्षमतेने भरले होते. येथील हातरिक्षा, घोडेवाले तसेच छोटे-मोठे व्यावसायिकांनाही यामुळे रोजगार प्राप्त झाला.

आता पुढील आठवडाभरदेखील पर्यटकांचा राबता माथेरानमध्ये राहणार आहे. शनिवार, रविवारीसुद्धा माथेरान हाऊसफुल्ल होणार असल्याचे बोलले जात आहे.

**या दिवाळी हंगामात पर्यटक मोठ्या प्रमाणावर येथे दाखल झाले. त्यामुळे आम्ही माथेरानकर खूपच खुश आहोत. अजून आठवडाभर येथे पर्यटकांची मांदियाळी असणार आहे. खरेदीसाठी येथे पर्यटकांची चांगलीच लगबग पहायला मिळत आहे.**

**-पवन गडवीर, दुकानदार**

**मागील आठवडाभर दिवाळी हंगाम जोरदार होता. या आठवड्यात रूम बुकिंग कमी आहेत, मात्र पुढील शनिवार, रविवारी माथेरान पर्यटनस्थळी पर्यटक मोठ्या प्रमाणावर येतील असे वाटते.**

**-सुधीर जाधव, हॉटेल व्यवस्थापक**

सुरू असलेल्या दिवाळी हंगामात पर्यटकांचा वाढता प्रतिसाद पाहता व्यवसायात अजून चांगली उलाढाल होणार असल्याचे व्यावसायिकांमधून बोलले जात आहे.

# मनोज जरांगे-पाटील यांच्या खोपोलीतील सभेची तयारी पूर्ण

**खोपोली : प्रतिनिधी**

मराठा आरक्षण क्रांती मोर्चा नेते मनोज जरांगे-पाटील रविवारी रायगड जिल्ह्यात दाखल झाले आहेत. सोमवारी (दि. २०) त्यांची खोपोलीत भव्य सभा होणार आहे. सभेची संपूर्ण तयारी झाली असून स्थानिक प्रशासन, पोलीस यंत्रणेकडून सभास्थान व अन्य बाबींची पाहणी झाली आहे. जवळपास दोन ते अडीच लाख मराठा समाज बांधव या सभेला उपस्थित राहणार असल्याचे सांगण्यात येत आहे.



खोपोली नगरपालिका क्षेत्रातील चिंचवली शेडवली-लौजी डीपी रस्त्यालगत २५ एकरच्या मैदानात या सभेची तयारी करण्यात आली आहे. दहा एकर जागा वाहने पार्किंगसाठी व चार रस्ते सभा ठिकाणी येण्या-जाण्यासाठी सोमवारी सकाळपासून राखीव असणार आहेत. लौजी, चिंचवली, शेडवली व वासरंग ग्रामस्थांनी सभेसाठी आवश्यक सर्व सुविधा निर्माण होण्यासाठी मोठे योगदान दिले आहे. सोमवारी साधारण तीन वाजता मनोज जरांगे पाटील यांचे खोपोली शीळफाटा येथे आगमन होणार आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याला अभिवादन करून मनोज जरांगे सभास्थळी आगमन करतील. मोठा पोलीस बंदोबस्त खोपोली परिसरात व सभाठिकाणी असणार आहे.

एक हजार स्वयंसेवक, आरोग्य यंत्रणा, रुग्णवाहिका, फिरते स्वच्छतागृह, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था यांसह अन्य आवश्यक सर्व सुविधा उपलब्ध असणार आहेत.

## पोलादपुरात जल्लोषात स्वागत

**पोलादपूर** : मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे-पाटील यांचे प्रतापगड येथे दर्शनाहून आल्यानंतर तालुक्यातील कापडे बुद्रुक येथील मराठा समाजबांधवांतर्फे ज्ञानेश्वर सकपाळ यांनी जल्लोषात स्वागत केले.

जरांगे-पाटील यांनी कापडे कामथे रस्त्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला अभिवादन करून पोलादपूरकडे मार्गक्रमण केले. शहरात छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याजवळ १०१ मशालींसोबत त्यांचे स्वागत करण्यात आले. या वेळी सकल मराठा समाजाचे अध्यक्ष सुनील मोरे, सुरेश मोरे, वैभव चांदे, लक्ष्मण मोरे, रामदास कळंबे, भाई साबळे, रामचंद्र साळुंखे व अन्य स्थानिक कार्यकर्ते उपस्थित होते. मनोज जरांगे पाटील यांचा अध्यक्ष सुनील मोरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यानंतर मनोज जरांगे-पाटील महाडकडे रवाना झाले.




# वैजनाथ येथील कार्यकर्त्यांचा शिवसेनेत प्रवेश



**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यातील वैजनाथ गावातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी आमदार महेंद्र थोरवे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला.

सर्व कार्यकर्त्यांचे स्वागत आमदार महेंद्र थोरवे यांनी केले, तर शिवसेना पक्षचे रायगड जिल्हा सल्लागार गोविंद बैलमारे, कर्जत तालुका प्रमुख संभाजी जगताप, माजी तालुका प्रमुख बालाजी विचारे, कर्जत विधानसभा मतदारसंघ निवडणूक प्रमुख प्रसाद थोरवे, कर्जत तालुका संपर्क प्रमुख दिलीप ताम्हाणे, रमेश मते, कर्जत शहर प्रमुख अभिषेक सुर्वे, कर्जत नगरपरिषद स्वीकृत नगरसेवक संकेत भासे यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

आमदार महेंद्र थोरवे यांनी, आपल्याला गावाचा विकास साधायचा आहे. त्यासाठी तुमच्या माध्यमातून विकासकामे सुचविण्यात यावीत आणि ती कामे पूर्ण करून घेण्यासाठी तुम्ही सर्व कार्यकर्त्यांनी लक्ष ठेवावे, अशा सूचना केल्या. या वेळी सुमन साळोखे, प्रवीण साळुंखे, मंगेश साळुंखे, समाधान साळुंखे, राकेश येरुनकर, तुषार भोसले, भरत भोसले, चैताली साळुंखे, कुणाला साळुंखे, रमेश भोसले, दीपक भोसले, पूजा भोसले, रमेश बोडके, दीपक भोसले, पूजा भोसले, रमेश बोडके, गौरी बोडके, आरती भोसले, रेणुका साळुंखे, राहुल भोसले, संतोष भोसले, शोभा गुरव, रवी गुरव, राजश्री येरूणकर, कल्पना येरूनकर, राहुल येरुणकर, प्रवीण येरुणकर, सुदर्शन येरुणकर, मारुती येरूणकर, भावना साळुंखे, निशा साळुंखे, रमेश गुरव, बाळू साळुंखे, योगेश साळुंखे, आनंद काजरी, नरेश गुरव, बाबू वाघमारे, संतोष मुकणे, विष्णू वाघमारे, रोशन वाघमारे, दीपक विलकाष्टे, राहुल मुकणे, सुनील वाघमारे, संतोष मुकणे, भरत बोडके, क्रिश वाघमारे, गीता साळुंखे, बीबीबाई वाघमारे, लक्ष्मण मुकणे, नवी चंद्रमुकने, शुभम गुरव, नवभाई वाघमारे, निखिल भोसले, जय भोसले, पल्लवी भोसले, सचिन गुरव, गणेश साळुंखे, संजय साळुंखे, भगवान गुरव, अशोक गुरव, ओंकार गुरव यांनी प्रवेश केला.

# विश्व हिंदू परिषदेच्या शिबिरात १०७ जणांनी केले रक्तदान

**कर्जत : प्रतिनिधी**

विश्व हिंदू परिषद - बजरंग दल, मातृशक्ती, दुर्गावाहिनी (कर्जत-प्रखंड) यांच्या वतीने गीता जयंतीनिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी १०७ जणांनी रक्तदान केले. सार्वजनिक रक्तदाता राजाभाऊ कोठारी यांनी कर्जत-खालापूर तालुक्यात आयोजित केलेले हे ४८६वे रक्तदान शिबिर ठरले.

शहरातील श्री कपालेश्वर देवस्थानच्या सभागृहात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिराचे उद्घाटन रायगड जिल्ह्याचे विश्व हिंदू परिषदेचे विभाग प्रमुख प्रसन्न खेडेकर यांनी भारतमातेच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलन करून करण्यात आले.

विशाल जोशी, साईनाथ श्रीखंडे, राजाभाऊ कोठारी आदी उपस्थित होते. रक्षा घोलप हिने करून रक्तदानाचा शुभारंभ केला. रक्तसंकलनाचे काम घाटकोपर येथील समर्पण रक्तपेढीचे डॉ. रमेश सिंग, लक्ष्मण नाईक, धनश्री लाड, अनिता कवरनकर, अमित मौर्य, प्रदीप नितोरे, निकेश ताम्हणकर, संजय ठोंबरे, महेश गोरीवले, विपुल सिंग, सूरज जाधव, मंगेश गौरात आदींनी केले.

या वेळी भाजप तालुकाध्यक्ष राजेश भगत, माजी नगराध्यक्ष अशोक ओसवाल, उपसरपंच ॲड. योगेश देशमुख, नगरसेवक संकेत भासे, विश्व हिंदू परिषदेसह संयोजक संजय उलवेकर, विनायक उपाध्ये, जयंत वैद्य, केदार भडगावकर, सचिन ठाकूर, प्रतीक पाटील, विनोद बडेकर, हर्षल पारखी, गणेश ठोसर, अनंत हजारे, सत्यम श्रीखंडे, स्वप्नाली पाटील, विशाल पाबळे, सतीश श्रीखंडे, किरण ठाकरे, दीपक बेहेरे, सुनील गोगटे, रमेश मुंढे, दिनेश कडू, हभप दिलीप राणे, हभप चैतन्य खंडागळे, सतीश देशमुख, गुरुनाथ मुंबईकर, नंदकुमार मणेर, चेतन शाह आदी उपस्थित होते.



# मजगाव येथील वाल्मिकी पतसंस्था निवडणुकीत कोळी समाजाचे वर्चस्व



**मुरूड : प्रतिनिधी**

कोळी समाजाने समाजातील लोकांना सहज गतीने कर्ज प्राप्त व्हावे, यासाठी मजगाव येथे वाल्मिकी नागरी सहकारी पतसंस्था स्थापन करण्यात आली. या पतसंस्थेवर मजगाव नवापाडा, चौकीचा पाडा, दौडकूलपाडा कोळी समाजाचे वर्चस्व आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून वाल्मिकी पतसंस्था प्रगतीपथावर असून सुयोग्य कारभार सुरू आहे. या पतसंस्थेच्या निवडणुकीत ११ संचालक निवडून दिले जातात. त्यापैकी पाच संचालक बिनविरोध निवडून आले होते, तर सहा जागेसाठी निवडणूक घेण्यात आली होती. या निवडणुकीत चौकीचा पाडा, नवापाडा व दौडकूलपाडातील कोळी समाजाचे प्रतिनिधी विजयी झाले आहेत. या समाजाचे विजयी उमेदवार नामदेव अंबाजी, रामकृष्ण अंबाजी, संतोष जमनू, जयवंत बुल्लू, संतोष बुल्लू, नरसिंह मानाजी हे मोठ्या मताधिक्याने विजयी झाले आहेत.

याबाबत चेरमन कृष्णा अंबाजी यांनी सांगितले की, ही पतसंस्था समाजाने निर्माण केलेली आहे. या पतसंस्थेला प्रगतीपथावर नेण्याचा आम्ही नेहमीच प्रयत्न केला आहे. आज समाजाने आमच्या कामावर विश्वास ठेऊन सर्व सदस्यांना मोठे मताधिक्य दिल्याने विजयी झाले आहेत. त्याबद्दल समाजाचे आम्ही आभार व्यक्त करीत आहोत.

# डॉ.सीमा पाईकराव यांचा रोटरी क्लबकडून सन्मान



**खोपोली** : ईर्शाळवाडीत घडलेल्या घटनेनंतर दुर्घटनाग्रस्त ठिकाणी केलेल्या कामाची दखल घेत लोहप प्राथमिक आरोग्य केंद्राच्या डॉ. सीमा पाईकराव यांचा रोटरी क्लबतर्फे सन्मान करण्यात आला. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. शैलेश पालेकर, रोटरी क्लब अध्यक्ष रेश्मा कुरूप, संयोगिता टेमघरे, गणेश म्हात्रे, वसंतराव मंजुळकर, पुष्कराज मुळे यांची उपस्थित होते.

# मुरूडमध्ये राष्ट्रीय सहकार सप्ताह उत्साहात

**मुरूड : प्रतिनिधी**

तालुका सहाय्यक निबंधक अशोक मोरे यांचे मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सहकार सप्ताह येथील माळीसमाज सभागृहात अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात तालुक्यातील जय श्रीराम नागरी सहकारी पतसंस्थेचे व्हाईस चेअरमन मेघराज जाधव, महात्मा फुले नागरी पतसंस्थेचे चेअरमन अजित गुरव, व्हाईस चेअरमन अमिता चौलकर, श्रीकाळभैरव पतसंस्थेचे चेअरमन दीपक पालशेतकर, कोर्लई ग्रामीण पतसंस्थेचे व्यवस्थापक वेगस आदी उपस्थित होते.



सहाय्यक निबंधक अशोक मोरे म्हणाले की, सहकाराची पायाभूत मूलतत्त्वे संस्थांर्तगत लोकशाही मूल्यांची जपणूक करणारी आहेत. संस्थाचालक हे मालक नसून विश्वस्त आहेत. याचा विसर पडू देता कामा नये. तालुक्यातील सहकारी संस्थांचे संचालक, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रशिक्षण घेऊन सहकार चळवळ उर्जितावस्थेत यावी अशी अपेक्षा व्यक्त केली.

सहकार सप्तानिमित्त मनोगत व्यक्त करताना सहकार भारती जिल्हाध्यक्ष मेघराज जाधव म्हणाले की, देशात एक लाख १० हजार सहकारी पतसंस्था कार्यरत असून २९ कोटी सभासद तर ११० लाख कोटी ठेवी असुन एकूण लोकसंखेच्या २५ टक्के लोकसंख्या सहकार क्षेत्राशी निगडीत आहे. सहकरातून स्वावलंबन, आत्मविश्वास आणि सहकार्य करण्याची भावना वृद्धिंगत होत असून आर्थिक प्रगती साध्य होते असे मत व्यक्त केले. येत्या २ व ३ डिसेंबर रोजी दिल्ली येथे सहकार भारतीतर्फे पतसंस्थाचे राष्ट्रीय महाअधिवेशन असून महाराष्ट्रातून पाच हजार प्रतिनिधी अपेक्षित आहेत. तेव्हा या अधिवेशनास जास्तीत जास्त संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन केले.

महात्मा फुले पतसंस्थेचे चेअरमन अजित गुरव यांनी, जिल्हा मध्यवर्ती बँकेशी पतसंस्था संलग्न आहेत, तथापि जिल्हा बँकेने पतसंस्थांना सभासद करून घेण्यची मागणी सहाय्यक निबंधकांकडे केली. प्रा. दीपक पालशेतकर, उषा खोत यांनी आपले विचार व्यक्त केले.

कार्यक्रमात जय श्रीराम पतसंस्था, श्रीकाळभैरव पतसंस्था, परस्पर सहकारी पतसंस्था, मर्चंट पतसंस्था, कोर्लई ग्रामीण बिगर शेती पतसंस्था, सुपारी खरेदी विक्री संघ, मुरूड तालुका शिक्षक पतपेढीमधील संचालक, कर्मचारी उपस्थिती होते. प्रमोद वाघमारे यांनी उपसस्थितांचे आभार मानले.

# खोपोलीसह खालापुरात विजेचा लपंडाव

**खोपोली : प्रतिनिधी**

सण असो की, उत्सव विजेचा लपंडाव मात्र सुरूच असल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

खोपोली शहरासह खालापूर तालुक्यातील बहुतांश भागात विद्युत पुरवठा खंडित होण्याचे प्रकार दिवसागणिक वाढत आहेत. या प्रकारामुळे गृहिणींसह, विद्यार्थी, नोकरदार व छोटछोट्या व्यापाऱ्यांना त्रास सहन करावा लागत आहे. विद्युत पुरवठा सुरळीत ठेवण्यात महावितरण कंपनी अयशस्वी ठरत असल्याने नागरिक पुरते हैराण झाले आहेत.

देखभाल दुरुस्तीच्या कामासाठी दर मंगळवारी खोपोलीत सक्तीचे लोडशेडिंग करण्यात येते, मात्र या भारनियमनासह अतिरिक्त भारनियमनामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. मंगळवारव्यतिरिक्त विद्युत पुरवठा वारंवार खंडित होत असून सर्व जण वैतागले आहेत, तसेच रात्री-बेरात्री वारंवार विद्युत पुरवठा खंडित होणे सुरूच आहे.

दुसरीकडे महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून कार्यालयात गेलेल्या तक्रारदाराला समाधानकारक उत्तरे ही मिळत नसल्याने संतापात भर पडत आहे.


MAHATRANSCO

**SRM E-TENDER NOTICE NO. 04/2023-24**

Online bids (SRM e-Tenders) are invited for following works from the registered contractors. :

| SRM e-Tender No. | RFx No. | Name of work | Estimated cost in Rs. |
|---|---|---|---|
| 15/2023-24 | 7000029081 | Extension of concrete road, providing parking shed and various civil works at 100KV Morivali Substation. | 2403898.20 |
| 16/2023-24 | 7000029082 | Repairing of material stacking platform at 400KV Nagothane Substation. | 2421788.00 |
| 17/2023-24 | 7000029083 | Horticulture/Landscaping work at open area in colony premises at 400KV Substation, Nagothane. | 2407562.03 |

For detailed information, please see SRM e-Tender section of our website: **www.mahatransco.in.**
Contact person: Executive Engineer (Civil), Panvel. Telephone No. (022)27480325

**Executive Engineer (Civil), Panvel**

# नवी मुंबईत बफर झोन जाहीर करण्याची मागणी



**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई परिसरातील सतत च्या वाढत्या प्रदुषणाची शासकीय उच्च स्तरावर दखल घेतली जावी यासाठी नवी मुंबई विकास अधिष्ठानचे अध्यक्ष संकेत डोके यांनी थेट भारताचे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु, पंतप्रधान नरेंद्र मोदी तसेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र लिहून नवी मुंबईत नागरी वस्तीला अनुसरून 'बफर झोन' घोषित करावा, अशी मागणी केली आहे.

गेले अनेक दिवस नवी मुंबईत वायु प्रदूषणाने उच्चांक गाठला आहे. नागरीकांनी नवी मुंबई परिसरातील वायु प्रदुषण कमी व्हावे यासाठी प्रशासनाला काही उपाययोजना सुचवल्या आहेत. त्यामुळे प्रदुषण रोखण्यासाठी रहिवासी भाग लक्षात घेऊन 'बफर झोन' घोषित करण्याची गरज नवी मुंबईत भासू लागली आहे.

मुंबई व मुंबई लगतच्या प्रदेशात प्रदूषणाने कहर केला आहे. याची गंभीर दखल घेत मुंबई उच्च न्यायालयाने सुमोटो दाखल करून घेतल्यामुळे एम.एम.आर.डी. परिक्षेत्रातील सर्व नगरपालिकांना प्रदुषण रोखण्याचे निर्देश दिले आहेत, परंतु उपाययोजनांमध्ये तात्पुरत्या उपाययोजना केल्या जात आहेत. ज्यांचा प्रदुषण रोखण्यासाठी दुरगामी प्रभाव दिसून येत नाही. या सर्व बाबी लक्षात घेऊन नवी मुंबई विकास अधिष्ठानने 'स्वच्छ हवा हा माझा अधिकार' ही जन मोहिम सुरू केली आहे. यानुसार प्रत्येक रविवारी नागरीक सायंकाळी एक तास या जन आंदोलनात सामील होऊन वायु प्रदूषणाविरोधात एकत्र येत आहेत. नागरीकांनी नवी मुंबई परिसरातील वायु प्रदुषण कमी व्हावे यासाठी प्रशासनाला काही उपाययोजना सुचवल्या आहेत. यातली प्रमुख मागणी ही रहिवासी भाग लक्षात घेऊन 'बफर झोन' घोषित करण्यात यावा ही केलेली आहे. नवी मुंबईत होत असलेल्या वायु प्रदूषणात धुळी बरोबर रासायनिक वायुचाही मोठा समावेश आहे.

एमआयडीसीतील अशा प्रदूषणकारी कंपन्यांना रोखणे आवश्यक आहे मात्र त्याकडे दुर्लक्ष होत आहे. अखेर नागरिकांनी आंदोलनाचे हत्यार उचलले आहे. वायु उत्सर्जन कंपन्यांकडून बिनदिक्कत होत असल्याचे नवी मुंबई परिसरांत लावण्यात आलेल्या प्रदुषण मोजमाप यंत्रातून निष्पन्न झालेली आहे. यामुळे हे रासायनिक वायु प्रदुषण रोखणे अतिशय गरजेचे आहे ही बाब संकेत डोके यांनी प्रशासनाच्या लक्षात आणून दिलेली आहे. नवी मुंबईतील एमआयडीसी व सिडकोच्या चुकीच्या धोरणांमुळे दोनही प्रधिकारणाच्यावतीने सोडण्यात आलेले हरित क्षेत्र वाढत्या नागरीकीकरणामुळे संपुष्टात आले आहे.

### '...तर प्रदूषण करणारे घटक येणार नाहीत'

कारखान्यांमधून उत्सर्जित होणारा वायु थेट रहिवासी परिसरांत उतरत असल्याचे चित्र नवी मुंबईत दिसून येत आहे. ही बाब संकेत डोके यांनी पत्रातून केंद्र सरकारच्या निदर्शनास आणली आहे. यामुळे हे प्रदुषण रोखण्यासाठी तातडीने नवी मुंबई परिसरातील रहिवासी भागाला अनुसरून 'बफर झोन' घोषित करण्यात यावा ही मागणी राष्ट्रपती व पंतप्रधान तसेच मुख्यमंत्री यांच्याकडे केली आहे. यामुळे भविष्यात या बफर झोन परिसरांत कोणतेही प्रदुषण करणारे घटक येणार नाहीत जेणेकरून नागरिकांना मोकळा श्वास घेता येईल, असे संकेत डोके यांनी सांगितले.



## सारसोळे मच्छी मार्केटसाठी निधी मंजूर

**नवी मुंबई : बातमीदार, प्रतिनिधी**

आमदार मंदा म्हात्रे यांच्या विकास निधीमधून तब्बल रक्कम ७७ लाख रुपये निधी मंजूर करून सारसोळे गावातील स्थानिक मच्छीमार बांधवाकरिता मच्छी मार्केट उभारण्यात येणार असून त्याचे भूमिपूजन सोहळा शनिवारी (दि. २५) सारसोळे गाव सेक्टर ८ मच्छीमार्केट येथे होणार आहे.

सारसोळे गावातील मच्छी मार्केट हे पूर्ण मोडकळीस अवस्थेत आले आहे. या धोकादायक अवस्थेतील मार्केटमध्ये कुठल्याही प्रकारची जीवितहानी होऊ नये म्हणून सारसोळे येथील स्थानिक ग्रामस्थांनी आमदार मंदा म्हात्रे यांच्याकडे नव्याने मार्केट बांधून द्यावे, अशी मागणी केली होती. त्यानुसार आमदार विकास निधीमधून रक्कम ७७ लाख रुपये निधी मंजूर करून सर्व सुविधायुक्त अशा मच्छीमार्केटची वास्तू उभारण्यात येणार आहे.

येत्या काळात नवी मुंबईतील सारसोळे ग्रामस्थांसाठी सुसज्ज सर्व सुविधायुक्त असा मच्छी मार्केट पहावयास मिळणार आहे, असे आमदार मंदा म्हात्रे यांनी सांगितले.

## अवैधरीत्या तोडलेली भिंत पुन्हा उभारण्यास सुरुवात

**नवी मुंबई : बातमीदार**

सध्या वाशी कोपरी गावातील नागरिक प्रदूषणाने त्रस्त आहेत. एकीकडे एमआयडीसीतील वायु प्रदूषित करणाऱ्या कंपन्या तर दुसरीकडे कोपरी गावाशेजारी असलेल्या रेल्वेच्या खडी साठवणूक डेपोमुळे धूलीकणांनी कोपरी परिसरांतील वायु प्रदुषणात भर पडली आहे. मुख्य म्हणजे या खडी डेपोशेजारी असलेली पालिकेची भिंत अवैधरीत्या काढून त्यातून खडी वाहतूक सुरू होती. याविषयी नवी मुंबई विकास अधिष्ठानचे अध्यक्ष संकेत डोके तसेच नागरिकांनीदेखील आवाज उठवला होता. पालिकेच्या निदर्शनास आणून दिले होते. अखेर पालिकेने ही भिंत उभारण्यास सुरुवात केली आहे.



रेल्वेकडून सुरू असलेल्या 'खडी साठवणूक डेपो' मुळे मोठ्या प्रमाणावर धुली कनांचा समावेश होत आहे. ज्यामुळे येथील हवा गुणवत्ता मूल्यांकन नेहमी २०० च्या वर असते. त्यामुळे सुचवलेल्या उपाययोजनांमध्ये 'कोपरी पुलाखाली रेल्वे कडून सुरू असलेल्या खडी साठवणूक डेपोला नागरी इमारतींपासून दुर स्थलांतरीत करावे' अशी मागणी करण्यात आली होती. यासाठी खडी वाहतूक करणारे डंपर या खडी डेपोकडे जाण्यासाठी कोपरी पुलाखालील रस्ता अवैधरीत्या महापालिकेची संरक्षण भींत तोडून वापरत होते तो रस्ता बंद करण्यासाठी तोडलेली संरक्षण भिंत पुन्हा नव्याने उभारण्याचे काम सुरू केले आहे.

महापालिकेने दाखवून नागरीकांना प्रदुषणाच्या बाबतीत कोणतीच तडजोड प्राधीकरणाकडून केली जाणार नाही असे आश्वासित केले होते तसेच महापलिकेनेही प्रदुषण कमी करण्यासाठी थेट नागरीकांशी संवाद सुरू केल्यामुळे पर्यावरण अधिकारी शिरीष आरादवाड यांचे नागरीकांकडून कौतुक केले जात आहे.

## सीवूड्समध्ये घराला आग; सुदैवाने जीवित हानी टळली

**नवी मुंबई : बातमीदार**

सीवूड्स पूर्व विभागतील सेक्टर २५ येथील अंबिका हाइट्स सोसायटीतील बाराव्या मजल्यावर १२०३ क्रमांकाच्या फ्लॅटमध्ये अचानक आग लागल्याने सोसायटीत भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.



सोसायटीच्या सुरक्षारक्षकांनी तत्काळ वीज पुरवठा खंडित केल्याने मोठी दुर्घटना टळली, परंतु आगीने रौद्ररूप धारण केल्याने घरात मोठे नुकसान झाले असून घरातून आगीच्या ज्वाळा व धूर मोठ्या प्रमाणात बाहेर पडताना दिसत आहे. या आगीमुळे सोसायटी सदस्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाल्याने सर्व सदस्यांनी तत्काळ तळमजला गाठला. सोसायटीपासून काही अंतरावरच असलेल्या नेरूळ अग्निशमन केंद्राच्या अग्निशमन दलाने तत्काळ घटनास्थळी पोहोचून बाराव्या मजल्यावरील १२०३ क्रमांकाच्या फ्लॅटमध्ये लागलेली आग विझवली. आगीची घटना घडलेल्या फ्लॅटमध्ये एक डॉक्टर महिला राहत असून आग लागण्याच्या काही वेळापूर्वीच कामानिमित्त ही डॉक्टर महिला घराबाहेर पडल्याने कोणतीही जीवित हानी झाली नाही, परंतु या दुर्घटनेत घराचे मात्र मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

अग्निशामन विभागाकडून अद्याप या घटनेचे ठोस कारण समोर आले नसून प्राथमिक अंदाजानुसार ही घटना शॉर्टसर्किटमुळेच लागल्याचे अग्निशमन विभागाचे अधिकारी कोळी यांनी सांगितले.

## नवी मुंबईतील उद्यानात आत्महत्या

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबईतील कोपरखैरणे भागात असलेल्या एका उद्यानातील झाडाला दोरी बांधून एका व्यक्तीने आत्महत्या केल्याचे समोर आले. प्रभातफेरीसाठी येणाऱ्या एका व्यक्तीच्या नजरेस लटकता मृतदेह पडला आणि त्यांनी याबाबत पोलिसांना कळवले होते.



पवन कुमार असे आत्महत्या केलेल्या युवकाचे नाव आहे. कोपरखैरणे सेक्टर २३ येथे शांतिदुत महावीर उद्यान आहे. पावसाळा वगळता रोज या उद्यानात शेकडो लोक प्रभातफेरी (मॉर्निंग वॉक) आणि उद्यानातील ओपन जिमचा वापर करीत व्यायामासाठी येतात. आज सकाळी काही जण नेहमीप्रमाणे पहाटे उद्यानात आले. उद्यानात गोल फेरी मारण्यासाठी सोय केली असून याच ठिकाणी एका झाडाला एक व्यक्ती गळफास घेतलेल्या अवस्थेत असल्याचे नजरेस पडले. त्यांनी तत्काळ याबाबत पोलिसांना माहिती देताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले.

त्यांनी अग्निशमन दलाच्या मदतीने मृतदेह खाली काढला. मृतदेहा जवळ आढळून आलेल्या कागदपत्रांवरून त्याचे नाव पवन कुमार असल्याचे समजले. तो कोपरखैरणे सेक्टर १९ येथे राहणारा असून तूर्तास आत्महत्या अशी घटनेची नोंद करण्यात आली आहे. ही घटना रात्री कधीतरी घडली असावी असा अंदाज आहे. पुढील तपास सुरू आहे. अशी माहिती उपस्थित पोलीस कर्मचाऱ्याने दिली.

याच परिसरात दोन छोटी तर एक मोठे उद्यान आहे . सर्वच उद्यानात सकाळ व संध्याकाळ मोठ्या प्रमाणात व्यायामासाठी व फिरण्यासाठी लोक येत असल्याने सर्व ठिकाणी ओपन जिम आणि लहान मुलांना खेळणी लावण्यात आली आहे. दिवसा सर्व उद्यानात सुरक्षा रक्षक असतात, मात्र रात्री तिन्ही उद्यानात मिळून एकच सुरक्षारक्षक गस्त घालत राखण करत असतो. त्यामुळे रात्र पार्ट्याही होत असल्याच्या तक्रारी रहिवासी करतात. आता तर उद्यानात कुठूनही दिसेल अशा झाडावरील एका फांदीला दोरी लावून आत्महत्या केल्याची प्रकार घडला आहे.

## शिवाई महिला मंडळाची अभ्यास सहल

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

सानपाडा येथील शिवाई महिला मंडळाच्या वतीने विभागातील विद्यार्थ्यांसाठी दोन दिवसीय किल्ले दर्शन आणि मार्गदर्शन अभ्यास सहल आयोजित करण्यात आली होती.



यावर्षी १७ आणि १८ नोव्हेंबर या दिवशी स्वराज्याची पहिली राजधानी दुर्गराज किल्ले राजगड येथे ही अभ्यास सहल झाली. विद्यार्थ्यांना आपली संस्कृती, किल्ले यांची माहिती व्हावी. त्यांच्यामध्ये शिवकालीन इतिहास, राष्ट्रप्रेम, आदर्श, शौर्य रुजवण्यासाठी ही सहल आयोजित करण्यात आली होती, अशी माहिती शिवाई महिला मंडळ अध्यक्षा शुभांगीताई सुर्यराव यांनी दिली. १४ वर्षांवरील विद्यार्थी या दोन दिवसीय किल्ले दर्शन अभ्यास सहलीसाठी उपस्थित होते.

या वेळी विविध माध्यमातून शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी प्रतिक्रिया व्यक्त केले की, सध्याच्या कॉन्व्हंट शिक्षणाच्या अभ्यासामध्ये छत्रपती शिवराय यांच्या विषयी अत्यल्प माहिती आहे, परंतु अशा प्रकारचे किल्ले दर्शन अभ्यास सहल आयोजित केल्याने आम्हाला छत्रपती शिवरायांचा प्रेरणादायी इतिहास, त्यांचे शौर्य हे जवळून पाहता आले याविषयी आम्ही आयोजकांचे आभार मानतो.

## रसायनीत म्युझिक स्टुडिओचे उद्घाटन

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

नवी मुंबईत सर्वांत प्रशस्त व सर्व सोयीयुक्त अत्याधुनिक म्युझिक स्टुडिओ व जामरुमचे उद्घाटन रसायनीतील शिवनगर मोहोपाडा येथील म्युझिक क्षेत्रातील कौशल गायकवाड यांच्या आईवडीलांनी लाखो रुपये खर्च करून उभारलेल्या सिनेक्षेत्रातील स्टुडिओचे उद्घाटन अजित पवार गट राष्ट्रवादी काँग्रेसच्या थेट सरपंच उमा संदीप मुंढे यांच्या हस्ते झाले.



यानंतर थेट सरपंच उमा मुंढे आणि माजी सरपंच संदीप मुंढे दांपत्याने श्री गणेश पुजनाचे दर्शन घेऊन अलॉक स्टुडिओची पाहणी केली. या वेळी डॉ. संतोष बोराडे यांनी प्रथम भक्तिगीत गायन केल्याचे व्हिडीओ दाखविण्यात आले.यावेळी स्टुडीओतील ड्रमसेट साहित्याचे वादन, गायनाचा माजी सरपंच संदीप मुंढे यांनी लाभ घेतला.

कार्यक्रमास वासांबे ग्रामपंचायतीच्या नवनिर्वाचित सरपंच उमा मुंढे, रसायनी परीसरातील लोकप्रिय नेतृत्व माजी सरपंच संदीप मुंढे आणि जीवनसंगीतचे संस्थापक डॉ. संतोष बोराडे, ग्रामपंचायत सदस्या रसिका खराडे हे या वेळी उपस्थित होते.

रायगड जिल्ह्यातील हे पहिले स्टुडीओ असून रसायनी आणि नवी मुंबईत स्थानिक कलाकारांना मनोरंजन क्षेत्रासाठी जागा उपलब्ध करून देणे आणि त्यांचे संगीत विविध डिजिटल प्लॅटफॉर्मवर उपलब्ध करून देण्यासाठी त्यांना मदत करण्याचे महत्वपूर्ण कार्य कौशल गायकवाड गेली दहा वर्षे सातत्याने करत आहेत. लॉप स्टुडिओच्या मदतीने या सत्कार्यात अधिक प्रभावी मदत मिळेल असे रसायनी पुत्र संगीतक्षेत्रातील कौशल गायकवाड यांचे म्हणणे आहे.

या स्टुडिओमध्ये ऑडिओ रेकॉर्डिंग, मिक्सिंग आणि मास्टरिंग, मल्टीट्रॅक रेकॉर्डिंग, म्युझिक प्रोडक्शन, पार्श्वभूमी संगीत, फॉली, व्हॉईस ओव्हर्स, म्युझिक व्हिडिओ शूट आणि इतर सर्व ऑडिओ आणि उत्पादन कार्य अत्याधुनिक पद्धतीने केले जाईल असे लॉप स्टुडिओचे संस्थापक कौशल विनायक गायकवाड यांनी सांगितले.

या वेळी डॉ. संतोष बोराडे, उमा मुंढे यांनी कौशलचे कौतुक केले. कौशल याने निवडलेल्या या वेगळ्या क्षेत्रात करीअर करण्याचे लहानपणाचे स्वप्न आज पुर्ण केल्याच्या प्रतिक्रीया मान्यवरांनी बोलताना दिल्या. या वेळी या क्षेत्रात आई रजनी गायकवाड आणि वडील विनायक गायकवाड यांनी मदत केल्याने कौशलने आईवडीलांना नतमस्तक होवून चरणस्पर्श केला.

## विमला तलाव येथे कविसंमेलन रंगले

**उरण : प्रतिनिधी, बातमीदार**

कोकण मराठी साहित्य परिषद व मधुबन कट्टाच्या माध्यमातून महिन्याच्या प्रत्येक १७ तारखेला उरण शहरातील विमला तलाव (गार्डन) येथे कविसंमेलन भरविले जाते. १७ नोव्हेंबर २०२३ रोजी विमला तलाव येथे ९७वे कवी संमेलन मोठ्या उत्साहात झाले.



कवी संमेलनाचे अध्यक्ष प्रा. डॉक्टर साहेबराव ओहोळ तर स्वागताध्यक्ष भरत पाटील होते. कवितेचा विषय-बोली भाषा आणि आली दिवाळी होता. या कवी संमेलनात अनुज शिवकर, भगवान म्हात्रे, रामचंद्र म्हात्रे, संग्राम तोगरे, चंद्रकांत कडू, अजय शिवकर, सि.बी म्हात्रे आदींनी उत्तम असे कविता सादर करून सर्वांना मंत्रमुग्ध केले. या वेळी रायगड भूषण प्रा. एल. बी. पाटील, ॲड. मच्छिंद्र घरत, सूर्यकांत दांडेकर, डॉ. प्रिती बाबरे, मारूती तांबे,चंद्रकांत मुकादम आदी उपस्थित होते. एन आय हायस्कूल शाळेचे चेअरमन तथा प्रसिद्ध उद्योजक सदानंद गायकवाड तसेच लायन्स क्लब उरणचे अध्यक्ष तथा एन आय स्कूल (प्राथमिक) उरणच्या मुख्याध्यापिका निलिमा विलास नारखेडे यांना गौरविण्यात आले.

सूत्रसंचालन व आभार मच्छिंद्रनाथ म्हात्रे यांनी मानले. एल. बी. पाटील यांनी १००व्या कविसंमेलना निमित्त राज्यस्तरीय काव्य स्पर्धा घेऊन त्या स्पर्धेत राज्यातील १०० कवींना प्रवेश दिला जाईल, असे सांगितले.

## लहुजी वस्ताद यांच्या चरित्रापासून प्रेरणा घ्यावी -डॉ. गायकवाड

**नवी मुंबई : बातमीदार**

'जगेन तर देशासाठी, मरेन तर देशासाठी' अशी शपथ घेणारे क्रांतिवीर लहुजी वस्ताद साळवे हे देशाच्या संरक्षणाचा विचार करणारे पहिले देशाभिमानी सेनानी होते. लहुजी वस्ताद यांच्या चरित्रापासून प्रेरणा घेणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन कोकण ज्ञानपीठ उरण महाविद्यालयाचे प्राचार्य तसेच आंतरराष्ट्रीय किर्तीचे व्याख्याते डॉ. बळीराम गायकवाड यांनी केले.



लहुजींच्या तालमीत नवभारताच्या निर्मितीमध्ये अनमोल योगदान देणारे क्रांतीकारक घडले. सामाजिक समतेच्या कार्यालाही गती मिळाली अशा शब्दात लहुजींच्या कार्यकर्तृत्वाचा गौरव केला. या वेळी डॉ. गायकवाड बोलत होते.

नवी मुंबई पालिकेच्यावतीने ऐरोलीतील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकामध्ये महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित 'विचारवेध' व्याख्यान शृंखलेअंतर्गत व्याख्याते डॉ. बळीराम गायकवाड बोलत होते. थोर क्रांतिकारक आणि अग्रणी समाजसुधारक क्रांतिवीर लहुजी वस्ताद साळवे यांच्या २२९ व्या जयंतीचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या 'लहुजी वस्ताद साळवे यांचे सामाजिक समतेचे स्वप्न' या विषयावर त्यांनी लहुजींचा प्रेरणादायी जीवनपट खुला करीत त्यांच्या चरित्रातून आजच्या पिढीने काय बोध घ्यावा याचेही मार्गदर्शक विवेचन केले. १६२१ ते १६९० या काळात छत्रपती शिवरायांच्या सैन्यात असलेल्या लहुजींच्या खापरपणजोबांपासूनचा अर्थात थोरले लहुजींपासूनचा वारसा कथन करीत शिवरायांच्या राज्याभिषेकप्रसंगी ६ जून १६७४ रोजी अनेक शूरवीरांना गौरविण्यात आले, त्यावेळी थोरल्या लहुजींना 'राऊत' ही पदवी प्रदान करण्यात आल्याची माहिती डॉ. बळीराम गायकवाड यांनी दिली.

नवी मुंबई महानगरपालिकेने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाच्या माध्यमातून ज्ञानाचे अफाट भांडार खुले केले आहे, त्याचा उपयोग मोठ्या प्रमाणात करून घेतला पाहिजे व प्रत्येकाने आपल्या मुलाबाळांना हे स्मारक दाखविले पाहिजे, असे आवाहन करीत व्याख्याते डॉ. बळीराम गायकवाड यांनी इथे आल्यानंतर एक वेगळीच ऊर्जा मिळते असा अनुभव सांगितला.

समाजविकास विभागाचे उपआयुक्त डॉ. श्रीराम पवार यांनी महानगरपालिकेच्या वतीने पाहुण्यांचे स्वागत केले व जनसंपर्क अधिकारी महेंद्र कोंडे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. 'विचारवेध'सारख्या व्याख्यानमालेतून नवी मुंबई महापालिका सुजाण नागरिक घडविण्याचे जे काम करीत आहे ते ऐतिहासिक असून ही व्याख्याने उन्नतीच्या मार्गावर जाण्यासाठी उमेद वाढविणारी असल्याचेही मत डॉ. बळीराम गायकवाड यांनी व्यक्त केले.

# कर्जतमधील प्रत्येक वॉर्डमध्ये १० लाखांचा निधी

## नगर परिषदेच्या सर्वसाधारण सभेत मंजुरी

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत नगर परिषदेच्या सर्वसाधारण सभेत २० नगरसेवकांच्या वॉर्डमध्ये प्रत्येकी १० लाखांची कामे प्रस्तावित करून सर्वसाधारण सभेत त्यांना मंजुरी देण्यात आली आहे.

नगर परिषदेच्या सभागृहात नगराध्यक्ष सुवर्णा जोशी यांच्या अध्यक्षतेखाली सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी मुख्याधिकारी वैभव गारवे, नगरसेविका डॉ. ज्योती मेंगाळ, भारती पालकर, सुवर्णा निलधे, प्राची डेरवणकर, संचिता पाटील, पुष्पा दगडे, वैशाली मोरे, नगरसेवक शरद लाड, विवेक दांडेकर, बळवंत घुमरे, सोमनाथ ठोंबरे, राहुल डाळींबकर, हेमंत ठाणगे उपस्थित होते.





सुरुवातीस नगरसेवक राहुल डाळींबकर यांनी आरपीआय नेते, पत्रकार धर्मानंद गायकवाड यांच्या श्रद्धांजलीचा ठराव मांडून सर्वांच्या वतीने श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यानंतर कामकाजाला सुरुवात झाली. दिव्यांग लाभार्थ्यांसाठीचा १०० टक्के निधी वापरला आहे, असे नगराध्यक्ष सुवर्णा जोशी यांनी सांगितले.

नगर परिषद हद्दीतील गल्ली बोळातील आवश्यक ठिकाणी पेव्हर ब्लॉक, चेकर्स टाईल्स, पीसीसी करणे हा विषय चर्चेला आल्यावर नगराध्यक्ष जोशी जोशी यांनी याबाबत नगरसेवकांनी आपापल्या वॉर्डातील कामे सूचवा ते पूर्ण करण्यात येतील, असे सांगितले. राहुल डाळिंबकर यांनी ज्या कोपरा गार्डनमध्ये स्टॅच्यू बसवलेत त्यांची स्वच्छता करा, कोपरा गार्डनची दुरुस्ती करा, अशी मागणी केली. नगरसेवक बळवंत घुमरे यांनी नगर परिषद कार्यालयाखालील बँकेची जागा रिकामी झाली आहे ती पुन्हा कोणाला तरी भाड्याने देऊन पालिकेचे उत्पन्न वाढवण्याचा प्रयत्न करावा, तसेच भिसेगाव व आमराई येथे बांधून पडलेले दुकानांचे गाळे भाड्याने देण्याचा विचार करावा. दहिवलीमध्ये मच्छीमार्केटची जागा आरक्षित आहे ती जागा सध्या भाडेतत्त्वावर घेऊन कर्जत शहराच्या अनेक ठिकाणी मच्छीवाले बसतात त्यांना त्या ठिकाणी नेऊन बसवा, सफाई कामगारांना ड्रेस कोड द्यावा अशा मागण्या केल्या. यावर मुख्याधिकारी वैभव गारवे यांनी, याबाबत मी स्वतः लक्ष देत असल्याचे सांगितले.

आस्थापनेवरील कायम कर्मचारी वर्गात वैद्यकीय भत्ता म्हणून प्रत्येकी १०० रुपये मात्र वेतनासोबत अदा करण्यात येतात, परंतु कर्मचारी वर्गास उपचाराकरिता १०० रुपये भत्ता व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचा वैद्यकीय लाभ मिळत नाही. त्यामुळे कर्मचाऱ्यांकरिता वैद्यकीय प्रतिपूर्तीस मंजुरी मिळण्याचा ठराव मागील सभेत करण्यात आला होता. हा ठराव या सभेत कायम करण्यात आला.

जिल्हा शल्य चिकित्सकांची मंजुरी नंतर व तसेच शासन धोरणानुसार नियम १९६१चे तरतुदीचे अधीन राहून देण्याबाबत तरतूद आहे. नगर परिषदेच्या निधीची आर्थिक परिस्थितीच्या अनुषंगाने कर्जत नगर परिषद कायम कर्मचाऱ्यांच्या आरोग्य खर्चाच्या वैद्यकीय प्रतिपूर्ती करण्यास प्रशासकीय वित्तीय मंजुरी देण्यात आली. म्हणजेच कर्मचाऱ्याला त्याच्या आजारपणाचा वैद्यकीय खर्च मिळणार आहे.

नगर परिषदेने महत्त्वपूर्ण विषय घेतल्याने कर्मचारी वर्गांमध्ये आनंद दिसत होता. सभागृहात झालेल्या चर्चेत राहुल डाळिंबकर, बळवंत घुमरे, शरद लाड, सोमनाथ ठोंबरे यांनी भाग घेतला.

# मराठा आरक्षणासंदर्भात कागदपत्र सादर करण्याचे आवाहन

## तहसील व जिल्हाधिकारी कार्यालयात विशेष कक्ष स्थापन

**अलिबाग : प्रतिनिधी**

मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जातीचे जात प्रमाणपत्र पात्र व्यक्तींना देण्याबाबतची कार्यपद्धती विहीत करण्यासाठी न्यायमूर्ती संदीप शिंदे (निवृत्त) यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आलेली आहे. शासन निर्णयान्वये शासनाचे विविध विभागामार्फत जातप्रमाणपत्र वितरित करण्याकरीता पुरावे संकलित करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. त्या अनुषंगाने जिल्हयातील नागरिकांकडून त्यांच्याकडील उपलब्ध असलेले पुरावे, वंशावळी, शैक्षणिक व महसुली पुरावे, संस्थानिकांनी दिलेल्या सनदा, राष्ट्रीय दस्तावेज इतर जुने अभिलेख स्वीकारण्यात येणार आहेत. त्यासाठी नागरिकांनी आपल्याकडील कागदपत्रे सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

नागरिकांमार्फत त्यांच स्तरावर असलेले पुरावे सादर करणे सोईचे होईल. रायगड जिल्ह्यातील नागरिकांकडून त्यांच्याकडील उपलब्ध असलेले पुरावे, वंशावळी, शैक्षणिक व महसुली पुरावे, संस्थानिकांनी दिलेल्या सनदा, राष्ट्रीय दस्तावेज इतर जुने अभिलेखे स्विकारण्यात येणार आहेत.

उपलब्ध पुरावे तालुक्यातील तहसील स्तरावरील स्थापित विशेष कक्षात किंवा जिल्हाधिकारी कार्यालयातील स्थापित विशेष कक्षात २१ ते २४ नोव्हेंबर या कालावधीत स्वीकारण्यात येणार आहेत. नागरिकांनी त्यांचेकडील उपलब्ध पुरावे दोन प्रतींसह नमूद ठिकाणी सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

# कुंडलिका खाडीत रोज लाखोंची डिझेल तस्करी

**धाटाव : प्रतिनिधी**

डिझेलमाफियांनी आपला मोर्चा आता रोह्यातील कुंडलिका खाडीकडे वळवला आहे. या खाडीतील वावेपोटगे बंदरामध्ये डिझेलमाफियांनी अड्डा तयार केला असून रोज लाखो रुपयांच्या डिझेलची तस्करी होत आहे. रात्रीच्या अंधारात होत असलेल्या या गोरखधंद्याकडे जिल्हा प्रशासनाने लक्ष द्यावे, अशी मागणी होत आहे.

दर दोन दिवसांनी ६० हजार लिटर डिझेलची तस्करी करण्यात येत असून हे माफिया नेमके आहेत तरी कोण, असा प्रश्न रोहावासीयांना पडला आहे. माफियांचे प्रशासकीय अधिकारी व पोलिसांशी लागेबांधे असल्याने तस्करी होत असल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे. या तस्करीमुळे सरकारचा करोडो रुपयांचा महसूल बुडवला जात असल्याचे निदर्शनास आले आहे.

डिझेल तस्कर समुद्रातील बेटमधून तेलाची चोरी करणाऱ्या हिंदुस्थानी जहाज तसेच परदेशी मालवाहतूक जहाजाच्या कॅप्टनबरोबर हातमिळवणी करून हजारो लिटर डिझेल कमी दराने विकत घेतात. डिझेलची ३० ते ३५ टक्के कमी दरात विक्री केली जाते, या विक्रीतून डिझेल तस्करी करणारे आठवड्याला जवळपास पाच ते सहा कोटी रुपये कमावतात.

तीन महिन्यांपूर्वी रायगड पोलिसांनी अलिबाग तालुक्यातील रेवस या गावात छापा टाकून ४६ हजार लिटर डिझेल जप्त केले. त्यानंतर मोठी खळबळ उडाली. सर्वत्र टीकेची झोड उठताच या तस्करांनी रेवस जेट्टीवर डिझेल उतरवण्याचे बंद करून त्यांनी आपले बस्तान आता कुंडलिका खाडीच्या तिरावर बसवण्यास सुरुवात केली आहे. गोफण बंदरात आपली डाळ शिजत नसल्याने या माफियांनी वावेपोटगे बंदराचा आधार घेतला आहे.

हे बंदर गावापासून दूर असून तिथे खाडीचे पाणी खूप खोल असल्याने समुद्रमार्गे येणारे मोठे बार्ज या बंदरामध्ये उभे करण्यात येतात व त्यातून दर दोन दिवसांनी डिझेलची तस्करी केली जाते.

# साळाव-मुरूड रस्त्यावरील खड्डे भरण्यास सुरुवात

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरुड-साळाव चेकपोस्टपासून कोर्लई, मांडला, बारशिव काशिद, दांडा, नांदगाव, उसरोली फाटा, मजगाव, मोरा, विहूर तसेच नबाब राजवाडा ते कोटेश्वरी मंदिरापर्यंत रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यांनी चालक त्रस्त झाले होते. त्यामुळे शनिवारपासून सार्वजनिक बांधकाम विभागाकडून खड्डे बुजावण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. त्यामुळे वाहनचालकांमधून समाधान व्यक्त होत आहे.



मुरूड-साळाव रस्त्यावर गेल्या वर्षी पावसाळ्यात पडलेले खड्डे अद्याप बुजवण्यात आलेले नव्हते. अनेकांनी खड्ड्यांबाबत विविध सामाजिक व राजकीय संघटना, बांधकाम खात्याला रस्ता दुरुस्तीचे निवेदन अनेक वेळा देण्यात आले होते.

या रस्तावरून प्रवास करताना नागरिकांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत होते. पर्यटकांची संख्याही यामुळे रोडावली होती. अखेर या रस्त्यावरील खड्डे बुजविण्यास सुरुवात केल्याने वाहनचालकांनी समाधान व्यक्त केले आहे.

या वेळी मुरूड येथील सार्वजनिक बांधकाम विभाग उपअभियंता रमेश गोरे यांना विचारणा केली असता ते म्हणाले की, रस्तावरील खड्डे बुजावण्यास सुरुवात झाली आहे. लवकरच खड्डेमुक्त रस्ता बनेल, अशी प्रतिक्रिया रमेश गोरे यांनी दिली.



**नागोठणे : येथील भाजपचे ज्येष्ठ कार्यकर्ते, प्रियदर्शनी चालक-मालक-वाहक संघटनेचे अध्यक्ष सिराज पानसरे यांची ज्येष्ठ कन्या शिफा हिच्या विवाहानिमित्त भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देत आशीर्वाद दिले. या वेळी नागोठण्याचे माजी सरपंच विलास चौलकर, जिल्हा भाजप उपाध्यक्ष राजेश मपारा, रायगड लोकसभा समन्वयक सोपान जांबेकर, रोहा तालुका सरचिटणीस आनंद लाड, सुभाष पाटील, संतोष लाड, रोहा तालुका अल्पसंख्याक सेल अध्यक्ष राऊफ कडवेकर, नागोठणे जि. प. गण अध्यक्ष शेखर गोळे, वसीम बोडरे, रयान सिराज पानसरे, तात्या पोत्रिक आदी उपस्थित होते.** (छाया : शामकांत नेरपगार)

# रेवदंडा बंदरावर मासळी खरेदीला गर्दी

**रेवंदडा** : दिवाळी सुट्टीसाठी आलेल्या पर्यटकांची रेवदंडा बंदरात मासळी खरेदीला गर्दी होत आहे. त्यामुळे सकाळच्या वेळी बंदराला जत्रेचे स्वरूप प्राप्त होते.

पर्यटक आवर्जून ताजी मासळी व सुकी मासळी खरेदीसाठी हजेरी लावू लागले आहेत. रेवदंडा बंदर हे तालुक्याचे ताजी मासळी मिळण्याचे मुख्य ठिकाण आहे. १५ दिवसांच्या सुट्टीमुळे पाडव्याच्या मुहूर्तावर पर्यटक हजर झाले आहेत. रायगडात येण्यासाठी फेरीबोट आणि रोरो सेवा असल्याने पर्यटक मोठ्या संख्येने येत आहेत. हे पर्यटक ताजी मासळी घेण्यासाठी बंदरावर मोठी गर्दी करीत आहेत.



# कर्जत नगर परिषदेमध्ये राष्ट्रीय एकात्मता दिवस



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत नगर परिषदेमध्ये स्व. इंदिरा गांधी जयंती व राष्ट्रीय एकात्मता दिन रविवारी (दि. १९) साजरा करण्यात आला. या वेळी राष्ट्रीय एकात्मता शपथचे वाचन करण्यात आले.

नगर परिषदेच्या सभागृहात नगराध्यक्ष सुवर्णा जोशी यांनी स्व. इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. मुख्याधिकारी वैभव गारवे, नगरसेविका डॉ. ज्योती मेंगाळ, भारती पालकर, सुवर्णा निलधे, प्राची डेरवणकर, संचिता पाटील, पुष्पा दगडे, वैशाली मोरे, नगरसेवक शरद लाड, विवेक दांडेकर, बळवंत घुमरे, सोमनाथ ठोंबरे, राहुल डाळींबकर, हेमंत ठाणगे तसेच नगर परिषद कर्मचारी उपस्थित होते. रवींद्र लाड यांनी शपथ वाचन केले.

# रोह्यात रब्बी हंगामात कडधान्यासह कलिंगडाची लागवड

**रोहे : महादेव सरसरबे**

रोहा तालुक्यात पूर्वी खरीप हंगामासह रब्बी हंगामातही भातशेतीची लागवड केली जात असत, परंतु शेतकऱ्यांनी शेतीत नवनवीन प्रयोग करीत रब्बी हंगामात कमी खर्चात कडधान्य लागवडीची सुरुवात केली. आज तालुक्यात रब्बी हंगामात विविध कडधान्य व भाजीपालासह कलिंगडाची लागवड शेतकऱ्यांनी केली आहे. यामध्ये प्रामुख्याने वाल, मूग, मटकी, तुर, चवळी, हरभरा आदी कडधान्याची लागवड केली.

तालुक्यात भाजीपाला व कडधान्यासह कलिंगड पिकाचीही लागवड करण्यात आली आहे. रायगड जिल्ह्यात मगर बंधूंचे कलिंगड प्रसिद्ध आहेत. संपूर्ण जिल्हासह वाशी, पुणे, मुंबई, ठाणे आदी शहरासह परराज्यातही रोह्याचे कलिंगड विक्रीला जात असतात. यावर्षीही कलिंगडची लागवड रब्बी हंगामात सुरू करण्यात आली आहे. कडधान्य, कलिंगड याचबरोबर रोहा तालुक्यात बाहे गावासह अन्य भागात मिरची व भाजीपाला घेतला जात आहे. येथील मिरचीलाही मोठी मागणी आहे.

शेतकऱ्यांनी रब्बी हंगामात पाण्याची कमतरता पाहता कमी खर्चात कडधान्य घेण्यास सुरुवात केली आहे, तर नदी काठावर भाजीपाला व कलिंगड पीक घेण्यास सुरुवात केली आहे. तालुक्यात भाजीपालासाठी ओळख असलेल्या बाहे गावातील शेतकऱ्यांनी मिरची लागवड ५० ते ५५ हेक्टरपर्यंत या रब्बी हंगामात लागवड केली. ही संपूर्ण शेती कुंडलिका नदीच्या पाण्यावर केली जाते.

रोहा तालुक्यात दिवसेंदिवस भाजीपाला लागवडीचे क्षेत्र वाढण्यास सुरुवात झाली आहे. पावसाळ्यात काकडी, कारली, माठ ही पीके घेतली जातात, परंतु रब्बी हंगामात मोठ्या प्रमाणात तालुक्यातील किल्लासह तालुक्यातील अन्य क्षेत्रावर कारली, शिराळी ५५ ते ६० हेक्टरवर भाजीपाला लागवड शेतकऱ्यांनी रब्बी हंगामात केली आहे. यांसह शेतकऱ्यांनी आपल्या शेतीच्या बांधावर पाच हेक्टरावर तूर लागवड केली आहे.

रोहा तालुक्यात प्रामुख्याने कलिंगड हे पीक रब्बी हंगामात घेतले जाते. महत्त्वाचे म्हणजे सर्वात आधी रोह्याचा कलिंगड बाजारात दाखल होत असतो. वाशी येथील मगर बंधूंचे कलिंगड संपूर्ण रायगड जिल्ह्यात प्रसिद्ध आहे. दर्जेदार उत्पादनासाठीसुद्धा ते प्रसिद्ध आहेत. रोहा तालुक्यात प्रामुख्याने कलिंगड हे पीक वाशी, बाहे, धाटाव परीसर व पिंगळसई परिसर, सुतारवाडी, चणेरा परिसरात ६० ते ६५ हेक्टर लागवड करण्यात आली आहे.

रोहा तालुक्यात प्रामुख्याने वाल हे पिक मेढा, सानेगाव, धाटाव, चणेरा, खारापटी, खारगाव आदी परिसरात घेतले जाते. चणेरा, मेढा, चिल्हे, सानेगाव भागात वाल, मुग, चवळी, हरभरा ही कडधान्ये पीक ९०० ते १००० हेक्टर क्षेत्रावर घेतले जाते.

सध्या तालुक्यात भाजीपाला, कडधान्य, कलिंगड चांगल्या प्रमाणात लागवड करण्यात आली असून ती आता पहिला टप्प्यात वाढ झालेली दिसून येत आहे.





# भिवपुरी रोड रेल्वे प्रवासी संघटनेचा वर्धापन दिन साजरा



**कर्जत : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे मेन लाईनवरील भिवपुरी रोड स्टेशन येथे प्रवाशांच्या समस्या मार्गी लावण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या भिवपुरी रोड रेल्वे प्रवासी संघटनेचा चौथा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

भिवपुरी रोड रेल्वे स्थानक येथून प्रवास करणारे प्रवासी यांची वाढती संख्या लक्षात घेऊन प्रवासी वर्गाकरिता हक्काची सर्व प्रश्न सोडवण्यासाठी एक प्रवासी संघटना स्थापन करण्यात आली. या वेळी मुख्य बुकिंग पर्यवेक्षक एम. जी. म्हसे यांच्या हस्ते केक कापून करण्यात आला.

स्थानक प्रबंधक एस. ए. पांडेन, रेल्वे प्रवासी संघटनेचे अध्यक्ष किशोर गायकवाड, रवींद्र राऊत यांच्यासह प्रवासी संघटनेचे पदाधिकारी, प्रवासी तसेच होमगार्ड, रेल्वे कर्मचारी या वेळी उपस्थित होते.

# सेमी फायनलमधील पराभवानंतरही न्यूझीलंड, द. आफ्रिकेला मोठे बक्षीस



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयसीसी एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेतील ४५ लीग सामन्यांनंतर भारत, दक्षिण आफ्रिका, न्यूझीलंड आणि ऑस्ट्रेलिया उपांत्य फेरीत पात्र ठरले होते. यामध्ये भारताने न्यूझीलंडला पराभूत केले आणि दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या हाय व्होल्टेज नॉकआऊट सामन्यात विजयी होत ऑस्ट्रेलियाने अंतिम फेरीत प्रवेश केला. किवी आणि प्रोटीज अंतिम फेरीत पोहचले नसले तरी त्यांना वनडे विश्वचषकातील अव्वल चार संघ म्हणून मोठी बक्षिसाची रक्कम मिळणार आहे.

या विश्वचषकाच्या उपांत्य फेरीतून बाहेर पडलेल्या संघांना म्हणजेच न्यूझीलंड आणि दक्षिण आफ्रिका यांना आठ लाख अमेरिकन डॉलर्स म्हणजेच सुमारे ६.६० कोटी रुपयांचे बक्षीस दिले जाणार आहे.

या विश्वचषकात लीग स्टेजमधून बाहेर पडलेल्या संघांना एक लाख अमेरिकन डॉलर्स म्हणजेच सुमारे ८३ लाख रुपयांचे बक्षीस दिले जाईल.

याशिवाय लीग टप्प्यातील प्रत्येक सामना जिंकणाऱ्या संघाला ४० हजार यूएस डॉलर्स म्हणजेच सुमारे ३३ लाख रुपये दिले जातील.

दक्षिण आफ्रिकेने लीग टप्प्यात सात विजय नोंदवले होते. यानुसार प्रत्येक सामन्याचे ४० हजार डॉलर पकडून त्यांना २.८० लाख डॉलर्स अर्थात दोन कोटी २४ लाख रुपये बक्षीस अगोदरच मिळणार होते. त्यानंतर उपांत्य फेरीत पोहचल्याचे अतिरिक्त आठ लाख डॉलर्स म्हणजे साधारण सहा कोटी रुपये त्यांना मिळणार आहेत. एकूण दक्षिण आफ्रिकेने भारतात विश्वचषकाच्या दरम्यान आठ कोटींहून अधिक कमाई केली आहे.

न्यूझीलंडने लीग टप्प्यात पाच विजय नोंदवले होते. यानुसार प्रत्येक सामन्याचे ४० हजार डॉलर पकडून त्यांना दोन लाख डॉलर्स अर्थात एक कोटी ६० लाख रुपये बक्षीस मिळणार होते. याविषयी आता उपांत्य फेरीत पोहचल्याचे अतिरिक्त आठ लाख डॉलर्स म्हणजे साधारण सहा कोटी रुपये त्यांना मिळणार आहेत. एकूण न्यूझीलंडने भारतात विश्वचषकादरम्यान आठ कोटींच्या आसपास (सात कोटी ६० लाख) रुपयांची कमाई केली आहे.

# कोलाड येथे जापनिज कराटे स्पर्धा

**रोहे : प्रतिनिधी**

रोहे तालुक्यातील कोलाड येथील एमडीएन फ्यूचर स्कूल या ठिकाणी जापनिज कराटे स्पर्धा झाली. या स्पर्धेस कराटेपटूंचा प्रतिसाद लाभला.

जिल्ह्यातील नऊ शाळांनी या स्पर्धेत सहभाग घेतला. स्पर्धेचे नियोजन फोर्थ डिग्री ब्लॅक बेल्टप्राप्त अमर यादव यांनी केले होते. ते उत्तम कराटे प्रशिक्षक असून एमडीएन फ्यूचर स्कूलमध्ये शिक्षक आहेत. स्पर्धेसाठी राष्ट्रीय पातळीवरील पाच पंच लाभले.

स्पर्धा मुले व मुलींच्या काता आणि कुमिते अशा दोन प्रकारांमध्ये आणि ६,८,१०,१२, १८ वर्षांखालील वयोगटात घेण्यात आली. या स्पर्धेत सर्वाधिक पदके पटकावून एमडीएन फ्यूचर स्कूलच्या एकूण २५ विद्यार्थ्यांनी राज्य पातळीसाठी पात्रता नोंदवली. १७ डिसेंबर रोजी वसई येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेतही यश मिळवू, असा विश्वास प्रशिक्षक यादव यांनी व्यक्त केला आहे.

स्पर्धेसाठी कोलाड विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव प्रकाश सरकले, एमडीएन फ्यूचर स्कूलचे डायरेक्टर देवेंद्र चांदगावकर, नॅशनल रेफ्री राम तुंबडे, अनिल सुर्वे, परेश शाह, बापू हसबन, उदय कुडेकर यांची उपस्थिती लाभली. संस्थेचे अध्यक्ष संदीप तटकरे यांनी सर्व यशस्वी खेळाडूंचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



(छाया : महादेव सरसंबे)

# शमीच्या गावात बांधले जाणार स्टेडियम

## योगी सरकारचा मोठा निर्णय

**लखनऊ : वृत्तसंस्था**

एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेत भारतीय क्रिकेट संघाचा स्टार गोलंदाज मोहम्मद शमीने दमदार कामगिरी केली. आता त्याचे मूळ गाव अमरोहाला शमीच्या कारनाम्यांचा फायदा होणार आहे. उत्तर प्रदेश प्रशासनाने त्याच्या गावी सहसपूर अलीनगरमध्ये क्रिकेट स्टेडियम बांधण्याची घोषणा केली आहे.

अमरोहाच्या गल्ल्यांमधून बाहेर पडून आंतरराष्ट्रीय जगतात प्रसिद्ध झालेले नाव म्हणजे मोहम्मद शमी. अमरोहाच्या जिल्हा दंडाधिकाऱ्यांनी शमीच्या गावात सहसपूर अलीनगरमध्ये मिनी स्टेडियम आणि ओपन जिम बांधण्याचा प्रस्ताव ठेवला आहे. अमरोहाचे जिल्हा दंडाधिकारी राजेश त्यागी म्हणाले, आम्ही मोहम्मद शमीच्या गावात मिनी स्टेडियम बांधण्याचा प्रस्ताव पाठवत आहोत. या प्रस्तावात खुली व्यायामशाळाही असणार आहे. शमीच्या गावात यासाठी पुरेशी जमीन आहे.

जिल्हा दंडाधिकारी राजेश त्यागी आणि मुख्य विकास अधिकारी अमरोहा यांच्या नेतृत्वाखालील जिल्हा प्रशासनाच्या पथकाने शमीच्या सहसपूर अलीनगर गावाला भेट दिली होती. मिनी स्टेडियम आणि ओपन जीम बांधण्यासाठी जमिनीच्या शोधात टीम तिथे पोहचली होती. मोहम्मह शमीप्रमाणे खेळात प्रगती करण्यासाठी त्यांच्या भागातील तरुणांना मदत करणे हा यामागचा उद्देश आहे.

# मेहनती वैष्णवीची भारतीय हॉकी संघात निवड

**फलटण : प्रतिनिधी**

भारतीय हॉकी संघात महाराष्ट्रातून फलटण तालुक्यातील आसू गावची वैष्णवी विठ्ठल फाळके हिची निवड झाली आहे. तिच्या जडणघडणीची एक एक आठवण भारावून सांगत होते. वैष्णवी ज्युनिअर हॉकी संघाची कर्णधार आणि भारतीय महिला हॉकी संघातील खेळाडू झाली आहे. ही ओळख तयार करण्यात सर्वांनाच खूप मेहनत घ्यावी लागली.




वैष्णवीच्या आतापर्यंच्या वाटचालीत आई-वडील, प्राथमिक शाळेतील शिक्षक आणि तिची अचूक निवड करणारे विकास भुजबळ यांचा मोलाचा वाटा आहे. बालेवाडीतही तिच्यावर खेळाचे चांगले संस्कार झाले आणि भारतीय संघातील एक चांगली हॉकी खेळाडू म्हणून ती सध्या आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवत आहे.

वैष्णवी आठव्या वर्षी घराबाहेर पडली. कधीही गाव आणि घर सोडून बाहेर न गेलेली मुलगी पुण्याला पाठवायची म्हणजे आई-वडिलांनी काळजावर दगडच ठेवला. शहरातील वातावरणाला गावाकडची मुले थोडी दबकूनच राहतात. तिचे वयही असे होते की फार काही कळतही नव्हते. पुण्यातून मला घेऊन परत गावाकडे चला म्हणून ती हट्ट करायची.

विकास भुजबळ या प्राथमिक शिक्षकाने केवळ मुलांची निवडच केली नाही, तर त्यांची पोटच्या पोरांसारखी काळजी घेतली. त्यांना तत्कालीन सातारा जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी महेश पालकर आणि मुख्य कार्यकारी अधिकारी शाम देशपांडे यांनीही मदत केली तसेच सोबत असणारे रवींद्र ननावरे, पांडुरंग निकाळजे, विजयकुमार नाळे, उत्तम चोरमले, संजय जगदाळे या शिक्षकांचीही मदत झाली.

# शमीला आलेल्या लग्नाच्या प्रपोजलवर हसीन जहाँने व्यक्त केली प्रतिक्रिया

**मुंबई : प्रतिनिधी**

आपल्या वक्तव्यांमुळे चर्चेत असणारी अभिनेत्री पायल घोषने भारतीय क्रिकेटपटू मोहम्मद शमीला थेट लग्नाची मागणी घातली होती. त्यावर शमीची पत्नी हसीन जहाँने प्रतिक्रिया दिली आहे.


विश्वचषक स्पर्धेच्या सुरुवातीला संधीच्या प्रतीक्षेत असलेल्या शमीला भारतीय संघात स्थान मिळताच त्याने 'पंजा' मारला. दोन सामन्यांमध्ये पाच-पाच आणि एका सामन्यात सात बळी घेऊन शमीने दबदबा निर्माण केला. शमीच्या खेळीचे सर्वच स्तरातून कौतुक होत आहे, तर प्रसिद्धीच्या झोतात असलेल्या



शमीबद्दल टिप्पणी करून काही मंडळी मजा घेत आहेत. अभिनेत्री पायल घोषने अलीकडेच एक अजब विधान करून चाहत्यांचे लक्ष वेधले होते.

शमीबरोबर लग्न करण्यासाठी तयार असल्याचे पायलने म्हटले. तिने शमीपुढे लग्नासाठी एक अटही ठेवली. शमी तुझे इंग्लिश सुधार, मी तुझ्याबरोबर लग्नासाठी तयार आहे, अशी पोस्ट पायलने केली. २ नोव्हेंबरला भारत विरुद्ध श्रीलंका सामन्यादरम्यान ही पोस्ट पायलने केली होती.

पायल घोष तिच्या या पोस्टनंतर प्रसिद्धीच्या झोतात आली. अभिनेत्रीच्या या विधानाबद्दल मोहम्मद शमीची पत्नी हसीन जहाँला विचारले असता तिने हे सेलिब्रेटींच्या बाबतीत होतच असल्याचे म्हटले. शमीने न्यूझीलंडविरूद्धच्या उपांत्य सामन्यात सात बळी घेतल्यानंतर हसीन जहाँने आनंद व्यक्त केला तसेच पायल घोषच्या विधानाबद्दल विचारले असता तिने म्हटले, हे सर्वकाही सेलिब्रेटींच्या बाबतीत होतच असते. सेलिब्रेटींना नेहमी लग्नासाठी प्रपोजल्स येत असतात.



## वर्ल्डकपनिमित्त गुगलने साकारले खास डुडल

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयसीसी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत रविवारी (दि.१९) भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात अंतिम सामना रंगला. या पार्श्वभूमीवर गुगलने खास डुडल साकारले होते.

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यादरम्यानच्या अंतिम सामन्यासाठी बनवलेल्या या डुडलमध्ये खेळपट्टी दाखवण्यात आली होती तसेच बॅट व विश्वचषकाचाही वापर केला गेला. हे डुडल पूर्णपणे क्रिकेटचा उत्साह दाखवताना दिसले. गुगल अक्षरामधील दुसऱ्या 'ओ'च्या जागी वर्ल्डकप ट्रॉफी, तर 'एल'च्या जागी बॅट झळकली. या डुडलवर क्लिक करताच अंतिम सामन्यासंबंधित प्रत्येक घडामोडीच्या अपडेट्स मिळत होत्या.

# विराट कोहलीचा अर्धशतकांचा विक्रम बाबर आझम मोडू शकतो -अकमल

**मुंबई : प्रतिनिधी**

विश्वचषक स्पर्धेत न्यूझीलंडसोबत खेळल्या गेलेल्या उपांत्य फेरीच्या सामन्यात विराट कोहलीने शतक झळकावून वनडे फॉरमॅटमधील ५०वे शतक पूर्ण केले. यासह तो या बाबतीत सचिन तेंडुलकरच्याही पुढे गेला आहे. विराटच्या या नव्या विक्रमावर पाकिस्तानचा माजी यष्टीरक्षक फलंदाज कामरान अकमलने मोठे वक्तव्य केले आहे. त्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

एकदिवसीय क्रिकेटमध्ये विराट कोहलीचा ५० शतकांचा विक्रम पाकिस्तानचा फलंदाज बाबर आझम मोडू शकतो, असा विश्वास पाकिस्तानचा माजी यष्टीरक्षक फलंदाज कामरान अकमल याने व्यक्त केला आहे. अकमलच्या मते अव्वल तीनमध्ये फलंदाजी करणारा फलंदाजच विराटचा वनडेतील सर्वाधिक शतकांचा विक्रम मोडू शकतो.

ए स्पोर्ट्स चॅनलच्या एका कार्यक्रमात बोलताना पाकिस्तानचा माजी खेळाडू कामरान अकमल




म्हणाला, विराटचा विक्रम फक्त अव्वल तीनमध्ये फलंदाजी करणारा फलंदाजच मोडू शकतो. मधल्या फळीतील फलंदाजाला हा विक्रम मोडता येणार नाही. आमच्याकडे बाबर आझम आहे, तो मोडू शकतो, कारण तो अव्वल तीनमध्ये खेळतो. भारताकडे सध्या शुबमन गिल आहे, तो या विक्रमाच्या मागे लागू शकतो.

बाबर आझमने पाकिस्तानसाठी ११८ वनडे सामन्यांमध्ये १९ शतके झळकावली आहेत. यंदाच्या विश्वचषक स्पर्धेत पाकिस्तानची खराब कामगिरी आणि उपांत्य फेरीच्या शर्यतीतून बाहेर पडल्यानंतर बाबरने कर्णधारपदाचा राजीनामा दिला होता.

# 'द ग्रेट खली' पुन्हा बनला बाबा!



**चंदिगड : वृत्तसंस्था**

डब्लूडब्लूईमध्ये भारताचा डंका गाजवणारा द ग्रेट खलीच्या घरी गुडन्यूज आली आहे. द ग्रेट खली म्हणजेच दिलीपसिंह राणा आता वडील बनला आहेत. त्याने इन्स्टा अकाउंटवरून एक रील शेअर केला आहे. त्यामध्ये तो एका जन्मजात मुलासह दिसून येत आहेत.

या रीलमध्ये दिलीपसिंह राणाने कॅप्शनही लिहित आपल्या शुभेच्छांमुळे आज मी एका मुलाचा बाप बनलो, असे म्हटले. द ग्रेट खलीने स्वत:च चाहत्यांना ही गुडन्यूज दिली. दरम्यान, खलीला पहिली एक मुलगी आहे.

द ग्रेट खलीच्या पत्नीचे नाव हरमिंदर कौर आहे. दोघांचे लग्न २००२ साली झाले होते. खलीची पत्नी हरमिंदर कौर ही मूळ जालंदरच्या नूरमहल गावच्या रहिवासी असून तिने दिल्ली विद्यापीठातून पदवी घेतली आहे. विशेष म्हणजे दोघांच्या लग्नानंतर खलीने रेसलिंगमध्ये डब्लडब्लूईमध्ये नशिब आजमावले. त्यानंतरच त्यांना देशात आणि विदेशात सर्वजण ओळखू लागले. खलीच्या मुलीचे नाव अवलीन राणा आहे. आता मुलाचे नाव काय ठेवतील याची उत्सुकता राहिल.

# वहाब रियाज पीसीबीच्या निवड समिती अध्यक्षपदी

**कराची : वृत्तसंस्था**

वनडे विश्वचषकातील खराब कामगिरीनंतर पाकिस्तान क्रिकेट बोर्डात वाद रंगला. बाबर आझमच्या संघाला उपांत्य फेरी गाठता न आल्याने शेजारील देशातील माजी खेळाडूंनी नाराजी व्यक्त केली आणि बाबरची हकालपट्टी करण्याची मागणी केली. बरेच दिवस वाद सुरू राहिला मग अखेर बाबर आझमने पीसीबीचे अध्यक्ष झका अश्रफ यांची भेट घेतल्यानंतर कर्णधारपदाचा राजीनामा दिला. अशातच संघाचा माजी खेळाडू आणि पाकिस्तानातील पंजाब राज्याचा क्रीडा मंत्री वहाब रियाजवर पीसीबीने एक मोठी जबाबदारी सोपवली आहे.




रियाजला नवीन सिलेक्टर म्हणून पदभार सोपवण्यात आला आहे.

पाकिस्तानी संघ आगामी काळात ऑस्ट्रेलियाविरूद्ध कसोटी मालिका खेळणार आहे. १४ डिसेंबर ते ७ जानेवारी या कालावधीत शेजाऱ्यांचा संघ ऑस्ट्रेलियाच्या धरतीवर तीन सामन्यांची मालिका खेळेल. या मालिकेसाठी संघ निवडण्याची जबाबदारी वहाब रियाजवर असणार आहे तसेच १२ ते २१ जानेवारीदरम्यान पाकिस्तान न्यूझीलंडसोबत पाच सामन्यांची ट्वेंटी-२० मालिका खेळणार आहे.

दरम्यान, वहाब रियाजने २००८मध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले. त्याने २७ कसोटी, ९१ वनडे आणि ३६ ट्वेंटी-२० सामन्यांमध्ये पाकिस्तानचे प्रतिनिधित्व केले आहे. अखेरच्या षटकांमध्ये 'विकेट टेकर' गोलंदाज म्हणून रियाजला ओळखले जायचे. त्याने क्रिकेटच्या तिन्ही फॉरमॅटमध्ये एकूण २३७ बळी घेतले असून १२०० धावा केल्या आहेत. विश्वचषकाच्या इतिहासात सर्वांत यशस्वी पाकिस्तानी गोलंदाजांमध्ये त्याचा दुसरा क्रमांक लागतो.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मताले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com